रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२१
www.ramprahar.com
रविवार, ८ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## सामाजिक न्याय विभागाचे विविध पुरस्कार जाहीर

**मुंबई :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून राज्यातील एकूण १३० पुरस्कारार्थ्यांची निवड या पुरस्काराकरिता करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ९० व्यक्ती आणि ४० संस्थांचा समावेश आहे. या पुरस्कारांचे वितरण येत्या १० जून रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात येईल.

अंतरंग
करंजाडेत हाऊसिंग सोसायटी पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग/३
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शुभम भोईरला 'रौप्य'/८

# राहुल गांधींना खोटं बोलण्याची सवय

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील आक्षेपांवर मुख्यमंत्री फडणवीसांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

रोज खोटं बोलले की लोकांना ते खरं वाटते, असा राहुल गांधींचा समज झालेला दिसतो. त्यामुळेच त्याच त्या गोष्टी सातत्याने बोलतात. वास्तविक निवडणूक आयोगाने यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये किती मतदार वाढले होते, या निवडणुकीत किती वाढले हे सगळे सप्रमाण दिले, पण रोज खोटं बोलायची सवय राहुल गांधी यांना लागली आहे, कारण ते स्वत:च्या मनाला समजावत आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या आक्षेपांवर प्रत्युत्तर दिले आहे.




काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही वृत्तपत्रांमध्ये लेख लिहीत महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतले आहेत. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राहुल गांधी यांच्या या लेखाबाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्या वेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य करीत राहुल यांचा समाचार घेतला.

जोपर्यंत राहुल गांधी सत्य स्वीकारणार नाहीत, जोपर्यंत ते जागे होऊन जमिनीवर काम करणार नाहीत तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलेही भवितव्य उरलेले नाही. मला वाटते की, स्वतःशी खोटं बोलून स्वत:ला दिलासा देण्याचे काम राहुल गांधी करीत आहेत. महाराष्ट्राच्या जनतेचा, आमच्या लाडक्या बहिणींचा अपमान राहुल गांधी करीत आहेत. त्यांनी जागे झाले पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिला.

दरम्यान, मतदारवाढीवर सतत भाजपला प्रश्न विचारणारे काँग्रेस नेते, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आकड्यांनिशी प्रत्युत्तर दिले आहे. २००९मध्ये पाच महिन्यांत ३० लाख मतदार कसे वाढले, असा सवालच त्यांनी केला.

बावनकुळे म्हणाले, राहुल गांधी म्हणतात महाराष्ट्रात पाच महिन्यांत ३९ लाख मतदारांची वाढ संशयास्पद आहे, पण राहुलजी २००९ला काय झाले होते? तुम्हाला आठवत नसेल तर मी सांगतो. एप्रिल २००९ला लोकसभा निवडणुकीत सात कोटी २९ लाख ५४ हजार मतदार होते, तर ऑक्टोबर २००९ला विधानसभा निवडणुकीत सात कोटी ५९ लाख ६८ हजार मतदार झाले. तेव्हाही फक्त पाच महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते. तेव्हा तुमचा निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस-आयोग युतीच होती? तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? याचे उत्तर द्या.

महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला नाकारले. आता बिहारमधील जनताही तुम्हाला हद्दपार करणार आहे. त्याच भीतीतून तुम्ही आतापासून पराभवाचे कारण देत आहात, असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

> राहुलजी २००४, २००९ला तुम्ही जिंकलात तेव्हा काही प्रश्न पडले नाहीत! आता पराभव झाला, महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला झिडकारले तेव्हा रडगाणे सुरू झाले. आकड्यांचे अर्धवट वाचन करून देशाला गोंधळात टाकण्याचा निरर्थक प्रयत्न करू नका. स्वतःचे अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा.
>
> **-चंद्रशेखर बावनकुळे, भाजप प्रदेशाध्यक्ष**

## ...ही तर बनावट नरेटिव्ह सेट करण्याची ब्लू प्रिंट -जे.पी. नड्डा

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या आरोपांवर निशाणा साधत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी जोरदार हल्ला चढवला आहे. राहुल गांधींचा नवा लेख म्हणजे एकामागून एक निवडणूक हरल्याचे त्यांचे दुःख आणि निराशेमुळे बनावट नरेटिव्ह सेट करण्याची ब्लू प्रिंट आहे, असे नड्डा यांनी म्हटले आहे.



ते पुढे म्हणाले, राहुल गांधी हे सर्व स्टेप बाय स्टेप करतात. त्यांच्या कृत्यामुळे काँग्रेसला प्रत्येक निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागते. आत्मपरीक्षण करण्याऐवजी ते विचित्र कट कारस्थान रचत असतात आणि फसवणुकीचा आरोप करतात. सर्व तथ्ये आणि आकडेवारीकडे दुर्लक्ष करतात. कुठल्याही पुराव्याशिवाय संस्थांची बदनामी करतात. त्यांना तथ्यांपेक्षा अधिक बातमीत राहण्याची आशा असते.

वारंवार उघडे पडूनही ते निर्लज्जपणे खोटेपणा पसरवत आहे. बिहारमध्ये त्यांचा पराभव निश्चित आहे. यामुळेच ते असे करत आहेत. लोकशाहीला नाटकाची गरज नाही. तिला सत्याची आवश्यकता आहे, असे टोलाही नड्डा यांनी राहुल गांधींना लगावला आहे.

*निवडणूक आयोगाने राहुल गांधींना फटकारले*/पान २ वर..

# रायगडात पावसाची जोरदार हजेरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

काही दिवसांच्या लपंडावानंतर शनिवारी (दि. ७) रायगड जिल्ह्यात पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली. अलिबागसह उरण, पनवेल, माणगाव, नागोठणे, पाली, म्हसळा, श्रीवर्धन, मुरूड भागात दुपारी मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसला.

सकाळी ऊन पडले होते, मात्र दुपारी आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि पावसाची सुरुवात झाली. काही भागात ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट झाला. मागील काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याने नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत होता. या पावसाने हवेत चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. संध्याकाळनंतर पावसाचा जोर कमी झाला.

दरम्यान, यंदा मान्सूनपूर्व पाऊस आणि वेळेपूर्वी दाखल झालेला मोसमी पाऊस यामुळे शेतीच्या कामांमध्ये व्यत्यय आला आहे. पेरणीची कामे अद्यापही खोळंबलीत. यापूर्वी पावसाने विश्रांती घेतल्यानंतरदेखील शेतातील पाणी, चिखल कमी झाला नव्हता. त्यामुळे अद्याप पेरणीच्या कामाला वेग आलेला नाही. काही शेतकऱ्यांनी चिखलातच पेरणी केली, तर काहींनी आता रोहू पद्धतीने पेरणीचा विचार सुरू केला आहे.

दुसरीकडे पावसाचा जोर वाढल्यामुळे दऱ्या-डोंगरातून वाहणारे धवधबे प्रवाहित झाले आहे. रायगडमध्ये धबधबे हा एक पावसाळी पर्यटनाचा भाग असून मुंबई, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात पर्यटक पावसाचा आनंद घेण्यासाठी येतात. धबधबे वाहू लागल्याने आता पर्यटनप्रेमींना तिथे जाण्याचे वेध लागले आहेत.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये तीन दिवसात सात नक्षलवाद्यांचा खात्मा

**बिजापूर :** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार नक्षलविरोधी मोहिमेत गेल्या तीन दिवसांत किमान सात नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. यामध्ये माओवाद्यांच्या सेंट्रल कमिटीचा सदस्य नरसिंह चाळम ऊर्फ सुधाकर आणि तेलंगणा राज्य समितीचा विशेष विभाग सदस्य भास्कर ऊर्फ मईलारापू अडेल्लू यांचा समावेश आहे. सुधाकरवर ४० लाखांचे, तर भास्करवर ४५ लाखांचे इनाम होते. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे व स्फोटके हस्तगत करण्यात आली आहेत.

### वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी निलेश चव्हाणला न्यायालयीन कोठडी

**पुणे :** वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात सहआरोपी करण्यात आलेल्या निलेश चव्हाण याची पोलीस कोठडी संपल्यावर शनिवारी (दि. ७) त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयात झालेल्या सुनावणीत निलेश चव्हाण याला १९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. चव्हाणला भारत-नेपाळ सीमेवरून पोलिसांनी अटक करण्यात आली होती.

## रायगड जिल्ह्यात ९ ते २३ जूनदरम्यान जमावबंदीचे आदेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१चे कलम ३७ (१) (३) अन्वये ९ जून रोजी रात्री १ वाजल्यापासून ते २३ जून रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात जमावबंदी आदेश लागू केले आहेत.

खालापूर, महाड, रोहा, खोपोली, रसायनी, माणगाव, अलिबाग अशा औद्योगिक भागांमध्ये कामगार आंदोलन व संपाचे प्रकार घडत असून. त्यामुळे अनेकवेळा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील काही भागांत हिंदू-मुस्लिम तसेच विविध धर्मीयांची मिश्र वस्ती असल्याने जातीय तणावाचे प्रसंग घडण्याची शक्यता तसेच ९ जून रोजी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या प्रमाणावर साजरा होणार असून लाखो शिवभक्तांची उपस्थिती अपेक्षित आहे. याशिवाय १७ व २० जून २०२५ रोजी राजमाता जिजाऊ स्मृतीदिन साजरे होणार आहेत.

या कालावधीत शस्त्र, लाठ्या, तलवारी, सोटे इत्यादी शारिरीक इजा करण्यायोग्य वस्तू बाळगणे; स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ घेऊन फिरणे; दगडफेक, क्षेपणास्त्रे व त्याची साधने बाळगणे; प्रतिमा, प्रेत, आकृत्यांचे प्रदर्शन करणे; आक्षेपार्ह घोषणा, गाणी, भाषणे वाजविणे वा सादर करणे; राज्यविरोधी भाषणे, चित्र, चिन्हांचा प्रसार करणे; पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा जमाव किंवा मिरवणूक पूर्वपरवानगीशिवाय घेणे यावर बंदी असेल. या कालावधीत वगळण्यात आलेल्या बाबी, शासकीय अधिकारी, ड्युटीवर असताना अधिकृत शस्त्र वापरू शकतील. **(पान २ वर..)**

## पेणमध्ये बापाकडून चिमुकलीची हत्या

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील पाबळ येथील देवमाळ ठाकूरवाडीत राहणाऱ्या एका व्यक्तीने रागाच्या भरात आपल्या एक वर्षाच्या मुलीला फरशीवर आपटून ठार केल्याची घटना घडली. सुरेश पद्या दोरे (वय ४०) असे या आरोपीचे नाव असून त्याला वडखळ पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत माहिती अशी की, आरोपी सुरेश दोरे हा रागीट स्वभावाचा असल्याने त्याचे कोणाबरोबर पटत नव्हते. त्याच्या दोन बायका त्याला सोडून गेल्या असून तिसरी बायकोही दीड महिन्यापासून सोडून गेली आहे. तेव्हापासून तो चार मुलांसोबत राहत होता. यातील एक वर्षाची मुलगी मृत विजया उर्फ बेबी हिला ताप आल्याने ती रडत होती. या गोष्टीचा राग येऊन आरोपी बापाने तिला फरशीवर आपटून मारले.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करून त्याची अलिबाग कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## 'मिसिंग लिंक'च्या कामाला आणखी मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाला चौथ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. सप्टेंबरपर्यंत प्रकल्प पूर्ण होणार अशी चर्चा असतानाच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी डेडलाईनबाबत महत्त्वाची अपडेट दिली आहे. मिसिंग लिंकच्या मार्गावरील व्हर्टिकल ब्रिजचे काम सुरू असून हे काम अवघड आहे. त्यामुळे हा प्रकल्प आता डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल, असे एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

मंत्रालयात नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या राज्यभरातील कामाचा आढावा घेतला. या बैठकीत मिसिंग प्रकल्पाची माहिती देण्यात आली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, व्हर्टिकल ब्रिजचे काम सुरू आहे. हे काम नियोजनबद्धतीने करणे गरजेचे असते. पावसाळ्यात लोणावळासारख्या भागात पुलाचे काम करणे कठीण असल्याने आता हे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होईल आणि त्यानंतर तो प्रवाशांसाठी खुला होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

एक्स्प्रेस वेवर बोरघाटात वाहतूक कोंडी होते. पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या घटनांमुळे यात भर पडते. ती टाळण्यासाठी एमएसआरडीसीने मिसिंग लिंकचा प्रकल्प हाती घेतला आहे.



### असा आहे प्रकल्प

- मिसिंग लिंक प्रकल्पासाठी सुमारे ६,६०० कोटी रुपये खर्च करण्यात आले असून या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे अंतर हे सहा किमीने कमी होऊन १९ किलोमीटरवरून १३.३ किलोमीटरवर येणार आहे. या प्रकल्पामुळे किमान ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे.
- मिसिंग लिंक प्रकल्प हा खालापूर ते खोपोली इंटरचेंज आणि खोपोली एक्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या भागाला जोडणार आहे. या मार्गावर १.६ किमी आणि ८.९ किमीचे दोन बोगदे आहेत, तर १८० मीटर उंचीचा सर्वात उंच पूल आणि सर्वात रूंद बोगदा असेल, अशी माहिती एमएसआरडीसीने दिली.

## वाढदिवस अभीष्टचिंतन



पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस शनिवारी साजरा झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. मंचावर आमदार विक्रांत पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक गणेश कडू आदी उपस्थित होते.

# भाजपमध्ये प्रवेशाचा ओघ वाढतोय!

## कोकण विभागीय कार्यशाळेत अनेकांच्या हाती 'कमळ'

**ठाणे : प्रतिनिधी**

भाजपचे राजकारण म्हणजे विकासाचे राजकारण याची खात्री आता जनतेलाही पटत आहे. हाच दृढ विश्वास आणि खात्री मनात बाळगून इतर पक्षातील नेते, कार्यकर्ते भाजप परिवाराचा मोठ्या संख्येने भाग होत आहेत. अशाच प्रकारे शुक्रवारी भाजप कोकण विभागीय कार्यशाळेदरम्यान प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत राजापूर पूर्व मंडळ तसेच नेरूळ येथील विविध कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या कार्यक्रमास आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी आमदार विनय नातू, महिला मोर्चा प्रदेश सचिव शिल्पा मराठे, रत्नागिरी महिला जिल्हाध्यक्ष वर्षा ढेकणे, अमित केतकर आदींसह भाजपचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.



गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने जनविकासाची अभूतपूर्व कामगिरी केली. विकसित भारत आणि महाराष्ट्र घडविण्यासाठी विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते भाजप परिवाराचा भाग बनत आहेत. याला अनुसरून संदेश कानडे, योगेश कानडे, विनय निबे, आदित्या मंडले, यश पालव, प्रणव जयस्वाल, ओंकार, नितेश पाटील, स्वराज भोसले, रितेश पाटील, प्रांजली कानडे, संतोष कानडे, पांडुरंग नारकर, ओंकार नारकर, प्रणय नारकर, साईश नारकर, प्रफुल्ल खाडये, रिमा नारकर, रूपिका नारकर, शुभम मांडवकर, नीरज खाडये आदी कार्यकर्त्यांनी 'कमळ' हाती घेतले. त्यांचे भाजप परिवारात स्वागत करून भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## निवडक

### उरणमध्ये मुसळधार पाऊस



**उरण :** गेल्या आठवड्यात पावसाने विश्रांती घेतली होती, पण शनिवारी (दि. ७) दुपारी २ वाजता मुसळधार पाऊस सुरु झाला. त्यामुळे सखल भागात पाणी साचले. परिणामी गाड्या बंद पडताना दिसत होत्या. कमी वेळेत अधिक पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले.

### शैलेश मेहता यांची निवड

**पनवेल :** सार्वजनिक क्षेत्र, संयुक्तक्षेत्र आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश असलेल्या देशातील खत



उद्योगाचे प्रतिनिधीत्व करणारी कंपनी फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया (एफएआय)ने दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाधन अॅग्रीटेक लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शैलेश सी. मेहता यांची नवीन अध्यक्ष म्हणून निवड केली. उद्योगात चार दशकांहून अधिककाळ अनुभव असलेले श्री. मेहता यांनी पाच वर्षांहून अधिककाळ फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया (वेस्टर्न रिजियन)चे अध्यक्ष म्हणूनदेखील काम केलेले आहे.



**उरण : नागाव व म्हातवली प्रकल्पग्रस्त मच्छीमार सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याने वैभव कडू यांचे अभिनंदन होत आहे. अनेकांनी त्यांना शुभेच्छा.**

## मतमोजणीत घोटाळ्याचा आरोप हास्यास्पद

# निवडणूक आयोगाने राहुल गांधींना फटकारले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बाजूने मतदान प्रक्रिया रचल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला होता. मात्र, निवडणूक आयोगाने शनिवारी ७ जून रोजी त्यांच्या या आरोपांना अवास्तव व निराधार ठरवले असून, राहुल यांच्या मुद्यांचे खंडन करणारे निवेदन प्रसिद्धिस दिले आहे.

राहुल गांधी यांनी द इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात एक लेख लिहून महाराष्ट्रात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला फायदा व्हावा यासाठी निवडणूक प्रक्रिया बिघडवण्यात आल्याचा आरोप केला. त्यांनी मतदार यादीत ७० लाख बनावट नावांची भर घालण्यात आल्याचाही आरोप केला.




यावर निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, मतदारांचा निर्णय आपल्या विरोधात गेला म्हणून आयोगाच्या निष्पक्षतेवर संशय घेणे आणि बदनामी करणे हे पूर्णतः गैर व हास्यास्पद आहे.

आयोगाने पुढे स्पष्ट केले आहे की, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली होती. सर्व राजकीय पक्षांचे अधिकृत एजंट मतदान केंद्रांवर उपस्थित होते आणि कुठल्याही वेळी काँग्रेसच्या एजंटांनी कोणतीही तक्रार केलेली नाही.

राहुल गांधी यांनी केलेल्या आणखी एका आरोपानुसार, निवडणूक आयुक्त व मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत केंद्र सरकारचा अतिरेक झाला आहे, कारण त्या प्रक्रियेतून भारताचे सरन्यायाधीश (CJI) यांना वगळण्यात आले आहे.

या आरोपावरही आयोगाने उत्तर देताना सांगितले, ही वक्तव्ये निराधार असून, अशा प्रकारचे आरोप यापूर्वीही काँग्रेसने केले होते. त्यावेळी दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी आयोगाने अधिकृत उत्तर देऊन संपूर्ण माहिती सार्वजनिक केली होती, जी अजूनही आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत INDIA आघाडीची कामगिरी पाहता लगेचच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आघाडीला केवळ ४६ जागा मिळाल्या, आणि भाजपप्रणीत युतीने स्पष्ट बहुमत मिळवले.

या दरम्यान राहुल गांधी यांनी असा दावा केला की, पाच महिन्यांत ७० लाख नविन मतदारांची भर घातली गेली. मात्र आयोगाच्या आकडेवारीनुसार, केवळ ४०.८१ लाख मतदारांची नोंद झाली होती. जी दरवर्षी होणाऱ्या नियमित अद्ययावत प्रक्रियेचा एक भाग आहे.

## पेणमध्ये स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पेण नगरपालिकेकडून शहरातील मुख्य ठिकाणी वृक्षारोपण तसेच स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत माझी वसुंधरा अभियाना मार्फत स्वच्छ शहर सुंदर शहर बनविण्याकरिता तसेच शहरातील पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आज वृक्षारोपण करण्यात आले. शहरातील विश्वेश्वर रोडवर सह शहरात ठिकठिकाणी शेकडो झाडांची लागवड करून मुख्य रस्त्यांवरील स्वच्छताही करण्यात आली.



या वेळी नागरिकांनीदेखील आपापल्या घराजवळ किंवा सोसायटच्यांच्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावून निसर्गाचे जतन करण्याचे आवाहन पेण नगरपालिकेकडून करण्यात आले आहे. तर आपले परिसर स्वच्छ व सुंदर ठेऊन शहरात नियमित फिरणाऱ्या घंटागाडीतच आपला ओला आणि सुका कचरा टाकण्याचे आवाहनसुद्धा या वेळी करण्यात आले.

या वेळी नगरपालिकेचे कार्यालय अधीक्षक किरण शहा, स्वच्छता निरीक्षक दयानंद गावंड, पाणी पुरवठा अभियंता प्रसाद जगताप, अशोक जाधव, गणेश बिडीये, शिवाजी चव्हाण, संजय पाटील पोरे सर आदिंसह वृक्ष प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेणमध्ये बकरी ईद सण उत्साहात साजरा



**पेण : प्रतिनिधी**

बकरी ईद अर्थात ईद उल अजहा सण मुस्लिम बांधवांच्या वतीने पेणमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पेणमधील खान मोहल्ला, खाटीक आळी, वडगाव येथील मशिदीमध्ये ईद उल अजहा ची नमाज अदा करण्यात आली.

बकरी ईद हा सण मुस्लिम बांधवासाठी महत्त्वाचा सण असून हा सण त्याग, श्रद्धा, आणि एकोपा याचे प्रतीक मानला जातो. यावेळी पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल, पोलिस उपनिरीक्षक समद बेग, शांतता कमिटी सदस्य अमोल घोरणे, पत्रकार संतोष पाटील, आनंद जाधव आदींनी या वेळी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

## चौक येथे ईद उत्साहात साजरी

**चौक : प्रतिनिधी**

तुपगाव चौक येथे ईद उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी मुस्लिम बांधवांनी एकमेकांना ईद सणाच्या शुभेच्छा देताना, हिंदू बांधवांनीदेखील मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

तुपगाव चौक येथे नमाज पठणानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना भेटून शुभेच्छा दिल्या. ईद हा सण, ज्याला बलिदानाचा पर्व किंवा बकरी ईद असेही म्हणतात. आज ईद उल अधार आहे. या ईद सणाची उत्पत्ती कुराणात नमूद केल्याप्रमाणे इब्राहिम आणि इस्माईलच्या बलिदानाच्या कथेपासून झाली आहे. यातून समर्पण आणि अल्लाच्या भक्तीची प्रचिती येते.

चौक परिसरात तुपगाव येथे एकमेव जामा मशीद असल्याने परिसरातील अनेक मुस्लिम बांधव या ठिकाणी येत असतात. चौक पोलीस, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.



## महावितरण भांडूप परिमंडळात वसुंधरा दिन



**भांडूप : प्रतिनिधी**

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ जून २०२५ रोजी वसुंधरा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

वसुंधरा दिवसाचा औचित्य साधून पर्यावरणपुरक उपक्रम म्हणून वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर, कर्मचाऱ्यांची रॅली काढण्यात आली. या वेळी मुख्य अतिथी म्हणून, कार्यकारी संचालक परेश भागवत, भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता, संजय पाटील, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे व इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महावितरणमध्ये राज्यभर वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला.

## रोहा तालुक्यात बकरी ईदचा उत्साह

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

तमाम मुस्लिम समाज बांधव आणि भगिनी ईदची नमाज अदा करून एकमेकांना गलाभेट देऊन ईदच्या शुभेच्छा देऊन मोठ्या उत्साहात आणि धार्मिक आणि पारंपारिक पद्धतीने शनिवारी (दि.७) साजरी करण्यात आली.

रोहा शहरातील खालचा मोहल्ला जामे मस्जिद,वरचा मोहल्ला, मस्जिद सलमान ए फारसी, अबूबकर मस्जिद, मिल्लतनगर, अष्टमी मोहल्ला व ग्रामीण भागातील न्हावे, कोकबान, सूडकोली, खैरे खुर्द, चांडगावं, कोलाड, नागोठणे, बेणसे इत्यादी ठिकाणी पहाटे ईदची नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मौलवी यांनी खुतबा पठण करून देशभरात शांती, समृद्धी आणि मानव जातीचा सर्वांगीण विकास व्हावं या दृष्टीने सामुदायिक दुवा (प्रार्थना) केली. ईद निमित्ताने प्रत्येक मशीदजवळ चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

ईद निमित्ताने तमाम मुस्लिम समाज बांधवांना खासदार सुनिल तटकरे, ना.अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे,पोलीस उप अधीक्षक रवींद्र दौंडकर, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख अॅड. मनोज कुमार शिंदे, सुनील देशमुख, समीर सकपाळ, मितेश कल्याणी, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, शिवसेना शहर प्रमुख दीपक तेंडुलकर, शहर प्रमुख मंगेश रावकर, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, राजू जैन, महेश सरदार,महेश कोलटकर, मयूर दिवेकर, अॅड.मयुरा मोरे आदींनी शुभेच्छा दिल्या.



## पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण कक्षाचे नूतनीकरण



**पोलादपूर : प्रतिनिधी**

ग्रामीण रूग्णालयाच्या बाह्यरूग्ण कक्षाच्या नूतनीकरणाच्या कामाचे लोकार्पण करताना अधिकाधिक बाह्यरूग्णांना याचा लाभ व्हावा आणि डॉक्टरमंडळींनी ग्रामीण भागातील रूग्णांवर उपचार करून सहकार्य करण्याची अपेक्षा रोहयो, खारलँड व फलोत्पादन मंत्री ना.भरत गोगावले यांनी व्यक्त केली.

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या बाह्यरूग्ण कक्षाचे नूतनीकरणाचे सुमारे १ कोटी रूपये खर्चाचे काम पूर्ण करण्यात आल्यानंतर मंत्री ना.भरतशेठ गोगावले यांच्याहस्ते पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या बाह्यरूग्ण कक्ष नूतनीकरणाचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी ना. गोगावले बोलत होते. या वेळी ना. गोगावले आणि नगराध्यक्षा शिल्पा दरेकर यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करण्यात आले. या वेळी तालुकाप्रमुख निलेश अहिरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त भेट दिलेल्या एलसीडी टिव्हीसेटचे कौतुकही ना.गोगावले यांनी केले.

यावेळी मंत्री ना.गोगावले यांच्यासोबत माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, तहसीलदार कपिल घोरपडे, सपोनि आनंद रावडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, सभापती सिध्देश शेठ व नगरसेवक नगरसेविका तसेच महिला आघाडीच्या पदाधिकारी, उद्योजक रामदास कळंबे, कृउबाचे संचालक लक्ष्मण मोरे, सिध्दीविनायक सोसायटीचे दत्ता मोरे आणि ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.पंकज पाटील, डॉ.राजेश सलागरे, डॉ.राजेश शिंदे, परिचारिका स्वप्नाली गांधी, पवार सिस्टर तसेच आरोग्य कर्मचारी व स्टाफ उपस्थित होता.

पान १ वरुन

### रायगड जिल्ह्यात ९ ते २३ जूनदरम्यान जमावबंदीचे आदेश

अंत्यविधी, प्रेतयात्रा, किंवा शासकीय समारंभ यासाठी हा आदेश लागू नाही. उत्सव, सभा, मिरवणूक यासाठी तहसीलदार, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक राहील. शांतता भंग न करण्याची जबाबदारी आयोजकांची असेल.

जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात येत असून कायदा-सुव्यवस्था भंग करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हा दंडाधिकारी रायगड-अलिबाग, संदेश शिर्के यांनी कळविले आहे.

## डॉ. सी.डी. देशमुख शहर सभागृहाची मंत्री आदिती तटकरेंकडून पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या डॉ.सी.डी. देशमुख शहर सभागृहाची पाहणी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी सायंकाळी केली.

या वेळी डॉ. सी.डी. देशमुख शहर सभागृहातील बांधण्यात येत असलेल्या आसन व्यवस्था, साऊंड सिस्टीम, पार्किंग, कलाकारांसाठी तयार करण्यात असलेल्या रूम याची पाहणी केली.

या वेळी ना. आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी उपस्थित ठेकेदाराला शहर सभागृह चांगल्या दर्जाचे व्हावे यासाठी सूचना दिल्या. संपूर्ण कामाची माहिती घेत हे सभागृह लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना दिल्या.



## महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात

### कर्मचाऱ्यांसह कुटुंबियांचा उत्स्फूर्त सहभाग

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणच्या कल्याण परिमंडलात महावितरणचा २०वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि.६) सायंकाळी उत्साहात साजरा झाला. नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी, अभियंते, अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांनी या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनानिमित्त एक ते सहा जूनदरम्यान कर्मचारी व ग्राहक केंद्रस्थानी ठेवत वीज वितरित करताना व ती वापरताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली.




महावितरणच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन कल्याण परिमंडलात एक ते सहा जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह उत्स्फुर्तपणे साजरा झाला. या सप्ताहात अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत मॅरेथॉन, रॅली, चित्रकला व निबंध स्पर्धा, रहिवाशी सोसायट्यांना भेटी अशा विविध माध्यमातून वीज सुरक्षेबाबत कल्याण एक व दोन, वसई, पालघर या चारही मंडलामंध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली.

सप्ताहाचा समारोप व महावितरणच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी कर्मचारी व कुटुंबियांसाठी मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन कल्याण, पालघर व वसईमध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महावितरणच्या २० वर्षातील वाटचालीचा आढावा घेणाऱ्या तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व व्यवस्थपकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या शुभेच्छा व वीज सुरक्षेबाबत घ्यावयाच्या काळजीबाबत मुख्य कार्यालयाकडून देण्यात आलेल्या चित्रफिती दाखवण्यात आल्या.

कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण परिमंडल, कल्याण एक आणि दोन तसेच कल्याण स्थापत्य मंडलांतर्गत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याण पश्चिमेतील आचार्य अत्रे नाट्यमंदिरात लेखक व दिग्दर्शक संतोष पवार यांच्या 'हीच खरी फॅमिलीची गंमत आहे' या नाटकाचा प्रयोग झाला.

## दुखवटा

### नारायण कुरंगळे

**मोहोपाडा :** येथील कै. नारायण शंकर कुरंगळे (वय ७५) यांचे निधन



झाले. यांच्या पश्चात तीन मुलगे, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. प्रेस फोटोग्राफर धाकटे चिरंजीव पंढरीनाथ कुरंगळे यांचे ते वडील आहेत. कै. नारायण कुरंगळे यांचा श्री समर्थ बैठकीशी घनिष्ट संबंध होता. त्यांचा दशक्रीया विधी रविवारी (दि.१५) गुळसुंदे येथील श्री क्षेत्र शिवमंदिर पाताळगंगा येथे करण्यात येणार आहे. तर तेरावे मोहोपाडा येथील राहत्या घरी होणार आहेत.

## निवडक

### वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत अनोळखी वृद्धाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. इंडेन ढाब्यासमोर पनवेल ते जेएनपीटी रस्त्यावर अपघात झाला. अपघातानंतर वाहनचालक पोलिसांना माहिती न देता त्या ठिकाणाहून पळून गेला असून त्याचा शोध सुरू आहे.

### स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन

**उरण :** शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा संघ यांच्या वतीने श्री स्वामींच्या मठाचा ७ वा वर्धापन दिन शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे श्री स्वामी समर्थ सेवा संघ कार्यकारी मंडळ अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी सांगितले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवेकऱ्यांनी मेहनत घेतली. पालखी मिरवणूक काढण्यात आली. महिला वर्ग मोठ्या प्रमाणात मिरवणूक, पालखीत सहभागी झाले होते. नेवेद्य आरती, भजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवू -सरपंच मंगेश शेलार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवू, असा विश्वास सरपंच मंगेश शेलार यांनी जनजीवन मिशन योजनेंतर्गत पाण्याच्या टाकीच्या कामाच्या पाहणी केली.

करंजाडे ग्रामंचायत हद्दीतील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाण्याची समस्या भेडसावत होती, मात्र भाजपची सत्ता ग्रामपंचायतवर येताच आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच मंगेश शेलार यांनी सातत्यपुर्ण पाठपुरावा करून नागरिकांना भेडसवणाऱ्या या समस्या सोडवण्यावर भर दिला. तसेच विविध उपायोजनांच्या माध्यामतून ही समस्या सोडवली.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संक्लपनेतून राबवण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत करंजाडे मध्ये पाण्याची टाकी उभारण्यात येत आहे. या टाकीचे काम पुर्णत्वास आले असून सरपंच मंगेश शेलार यांनी शुक्रवारी या टाकीच्या कामाची पाहणी करुन आढावा घेतला. यावेळी उसरपंच सागर आंग्रे, सदस्य सुरेश शेलार, राजेश भोईर, जयेश पवार उपस्थित होते.



## दोन अपघातांमध्ये दोघींचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तळोजा आणि कळंबोली येथे झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघींनीही प्रवासादरम्यान हेल्मेट घातले नसल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

या अपघातांची पहिली घटना पनवेल शीव महामार्गावरील रोडपाली येथील पुरुषार्थ पेट्रोल पंपासमोरील उड्डाणपूल उतरणीवर घडली. कळंबोलीत राहणारी १९ वर्षीय महिला मित्रासोबत दुचाकीवरून जात असताना पाठीमागून ट्रकची जोरदार धडक बसल्याने ती महामार्गावर कोसळून जागीच ठार झाली, तर दुसऱ्या घटनेत पनवेल मुंब्रा महामार्गावर खारघरच्या आर.एफ.ए. बटालियन कॅम्पच्या सिग्नलच्या चौकशेजारी कळंबोली येथे राहणाऱ्या महिलेला मानपाडा येथे दुचाकीने जात असताना भरधाव ट्रकने धडक दिली. यात त्यांचा मृत्यू झाला.

# करंजाडे येथे हाऊसिंग सोसायटी पदाधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण वर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार भारती पनवेल महानगरच्या वतीने १५ जून रोजी गृहनिर्माण हाउसिंग सोसायटीच्या पदाधिकारी व सभासदांकरिता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

करंजाडे येथील ग्रामपंचायत हॉल, पोलीस चौकीजवळ, सेक्टर ५ करंजाडे, पनवेल येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळात या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सहकार भारती पनवेल महानगरच्या वतीने करण्यात आले आहे. उपविधी आणि संस्थेचे दैनंदिन कामकाज या विषयावर ॲड. अपर्णा कुलकर्णी–नाडगौडी, लेखापरीक्षण व दोष दुरुस्ती अहवाल या विषयावर श्री कृष्णा राणे, तर अभी हस्तांतरण व मानवी हस्तांतरण या विषयावर किरण शिंदे हे मार्गदर्शन करणार आहेत.

प्रशिक्षण शिबिराचा समारोप सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश गृहनिर्माण प्रकोष्ट प्रमुख अश्विनी बुलाख यांच्या उपस्थितीत होणार असून या वेळी प्रश्नोत्तरेही होणार आहेत. गृहनिर्माण सोसायटीचे काम सुरळीतपणे व निकोप पार पडावे याकरिता सभासद आणि पदाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण घ्यावे, असे सहकार कायद्यान्वये अनिवार्य करण्यात करण्यात आले आहे.

यानुसार जास्तीत जास्त सहकारी सोसायटी सभासदांना प्रशिक्षण मिळावे या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण शिबिरामध्ये करंजाडे, पनवेल, नवीन पनवेल या परिसरातील हाउसिंग सोसायटी पदाधिकाऱ्यांनी ९९८७५८७२३५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहकार भारती पनवेल महानगरच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार महेश बालदींच्या हस्ते बिस्लेरी शॉपचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या हस्ते नुकतेच पूर्वी इंटरप्रायजेसचे बिस्लेरी शॉपचे उद्घाटन झाले.



या कार्यक्रमाला भाजप नेते रवी भोईर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शहा, उरण शहर भाजप युवा अध्यक्ष निलेश पाटील, राज्य प्रवक्ता मनसे नवी मुंबई गजानन काळे, कार्याध्यक्ष कोकण विभागीय लोहार समाज राजेश सोमवंशी, कोकण विभागीय लोहार समाज संघ सर्व पदाधिकारी, पनवेल को. ऑपेरेटीव्ह अर्बन बँक संचालक पांडुरंग भागीवंत, सिनियर सेल्स मॅनेजर बिसलरी नवी मुंबई आकाश ठाकरे, वीरेंद्र जाधव, कामार्ली सरपंच गजानन मोरे, महासचिव कोकण विभागीय लोहार समाज यशवंत गायकर, संजय गायकवाड, योगेश पाटील, अनिल गावडे, नितीन पाष्टे, प्रियांका पाटील, प्रकाश कांबळे, पत्रकार दिनेश पवार, संगिता पवार आदी उपस्थित होते.

आलेल्या मान्यवरांचे श्री. व. सौ. पूर्वी राहुल कोशे यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. त्यानिमित्त कामोठे येथील महिला भजन मंडळातील सदस्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शनिवारी भेट घेत पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी नंदा कथाले, रूपाली धाक, जना चोरगे, सुनिता जोशी, बबीता वाघमारे, रेखा पाटील उपस्थित होत्या.**

# पिरकोन गावासाठी दोन बाकडे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन येथील बबन पांडुरंग गावंड यांच्या स्मरणार्थ माजी सरपंच भागाबाई बबन गावंड यांच्याकडून एक बाकडा आणि सह्याद्रीचे डायरेक्टर दत्तात्रेय दुबळे यांच्याकडून एक बाकडा असे दोन बाकडे पिरकोन गावातील स्टॅन्डवर भेट देण्यात आले.



श्री.गणेश महीला बचत गटाला दत्तात्रेय दुबळे तथा सोनू साहेब यांनी मदत केली. तसेच वादळात नुकसान झालेल्या गरजू घरांना मदत केली. या वेळी या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जि.प सदस्य जीवन गावंड, उरण तालूका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, शाखाप्रमुख प्रशांत पाटील, माजी सरपंच व विद्यमान सदस्य के.वाय गावंड, रवी म्हात्रे, पुनाडे ग्रामपंचायत सदस्य रसीक पाटील, दिघाटी ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, यूवा नेतृत्व हर्षद भुरे, रायगड किसान विकास मोर्चा सदस्य गजानन गावंड, शिक्षक नेते नंदलाल पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते पद्माकर गावंड, बळवंत गावंड, रवी घरत, रमेश पाटील, पंढरी गावंड, जीवन म्हात्रे आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये रक्तदान शिबिरात १५१ बाटल्या रक्त संकलित

**पनवेल : वार्ताहर**

कुडाळदेशकर आद्य गौडब्राम्हण समाज मंडळ, पनवेल यांच्या वतीने आणि ओरायन मॉलच्या सहकार्याने शनिवारी पनवेल शहरातील ओरायन मॉल येथे भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण १५१ रक्ताच्या बाटल्या संकलित करण्यात आल्या.

या शिबिराचे उदघाटन पनवेल सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते करण्यात आले. याशिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल मंडळाचे अध्यक्ष मंगेश परुळेकर यांनी समाधान व्यक्त केले. या वेळी उपाध्यक्षा नंदा विभाकर नाईक, डॉक्टर शिवदास कांबळे, गंगाराम सामंत, यतीन ठाकूर, शाम वालावलकर, विनायक तिरोडकर, हरेष परुळेकर, चंद्रकांत तेंडोलकर, लक्ष्मण अवसरे, आकांक्षा अवसरे, माधुरी प्रभू, निशा वालावलकर, गीता प्रभू, नयन पाटकर, भारती खानोलकर, चेतना वालावलकर, मैंथिली सामंत, अपूर्वा प्रभू, अभय प्रभू, चिन्मय नाईक, पूर्णिमा तिरोडकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मंडळाच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले असून, गरजू रुग्णांसाठी रक्ताची उपलब्धता वाढण्यास मदत झाली आहे. या शिबिराच्या आयोजनात सहभागी झालेल्या सर्व रक्तदात्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मंडळाने आभार मानले.






**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेश म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नवनाथ म्हात्रे उपस्थित होते.**

## विजय पाटील यांना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्ल्याच्या परिसरात असलेल्या अतिदुर्गम आदिवासी आणि ग्रामीण भागातील बालकांना मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या युसुफ मेहेरअली सेंटरच्या भानूबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्थापनेपासून विद्यादानाचे काम करीत शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणारे आदर्श मुख्याध्यापक विजय चांगदेव पाटील यांचा सेवानिवृत्ती सोहळा रविवारी (दि.१) झाला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती उपाध्यक्ष संतोष पाटील, प्रमुख पाहुणे अलिबाग तालुका गटशिक्षण अधिकारी नितिष पाटील, युसुफ मेहेरअली सेंटरचे सचिव मधु मोहिते, ठाणे महानगरपालिका उपनिबंधक विनय पाटील, विद्याधर जोशी यांच्यासह शालेय समिती सदस्य, विजय पाटील यांचे कुटुंबीय, हितचिंतक उपस्थित होते.

दरम्यान, विजय पाटील यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले असून मागील वर्षीच सोबती सामाजिक संस्थेच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रासाठी दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## अवकाळी पावसामुळे भाज्या महागल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मे महिन्याच्या अखेरीस झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. भाजीपाल्याचे उत्पादन खराब झाले आहे, त्यामुळे बाजारात पुरवठा कमी झाला आहे. सध्या बाजारात आलेला भाजीपाला ओलसर आणि नाशवंत आहे. त्यामुळे भाज्यांचे दर वाढलेले आहेत. याचा फटका ग्राहकांना बसला आहे. पावसामुळे माल भिजल्याने मोठे नुकसान झाले. आवक कमी झाल्याने परिणामी दरवाढ झाल्याचे विक्रेत्याने सांगितले.

# कोकणगंधर्व राजाभाऊ शेंबेकर यांचे गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवेश पेंडसे व चिन्मयी डोंगरे यांच्या एका सोहळ्यानिमित्त एका संगीतसभेचे आयोजन करण्यात आले. पनवेल येथील श्री. बालाजी बेनक्वीट कार्यालयात हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात कोकणगंधर्व स्वराधिराज राजाभाऊ शेंबेकर, संगीत नाट्यकलाकार सुधांशु सोमण व वैदेही करंबेळकर यांचे गायन संपन्न झाले.




राजाभाऊ शेंबेकर यांनी 'जेथुनी उद्गार' या अभंगाने कार्यक्रमाचा प्रारंभ केला. त्यानंतर प्रेम वरदान हे नाट्यपद व दिवे लागले, प्रथम तुज पाहता ही गाणी सादर केली.

वैदेही करंबेळकर यांनी हृदयी प्रीत, का रे दुरावा, सलोनासा सजन, लपविलास तू हिरवा चाफा ही चित्रपटगीते सादर केली. सुधांशु सोमण यांनी जय शंकरा, मन लोभले आणि पद्मनाभा नारायणा या गाण्यांचे सादरीकरण केले.

या कलाकारांना हर्षल काटदरे यांनी संवादिनी व रामकृष्ण करंबेळकर आणि सुहास चितळे यांनी तबलासाथ केली. किरण गोखले यांनी ध्वनिसंयोजन केले.



**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते संदेश म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, युवा मोर्चा अध्यक्ष धीरज ओवळेकर, सरचिटणीस सुहास गोंधळी, युवा नेते प्रतिष पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.**



# नायक नहीं, खलनायक हू मैं...चा पुढचा भाग

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

नाना पाटेकर खलनायक म्हणून पहायला आवडले असते ना? त्याचं व्यक्तिमत्व, रोखून बघणे, रोखठोक बोलणे अशा भूमिकेला एकदम साजेसे.

अहो, निर्माता व दिग्दर्शक सुभाष घईने त्याचीच निवड केली होती. सौदागर (१९९१) यशानंतर सुभाष घईने वेगळ्या प्रवाहातील (तरी व्यावसायिक. उगाच पैसे कशाला खर्च करा. चित्रपट निर्मितीतील पैसा वसूल झालाच पाहिजे.) असा खलनायक चित्रपट निर्माण करायचा निर्णय घेतला. नाना पाटेकर केंद्रस्थानी हे पक्के केले. त्यानुसार सुभाष घई व नाना पाटेकर यांच्यात स्टोरी सिटींग सुरू झाल्या. तब्बल तीन चित्रपटांसाठी (विधाता, कर्मा व सौदागर) दिलीपकुमारला दिग्दर्शन केलेल्या आणि एव्हाना शोमन म्हणून बिरुद प्राप्त केलेल्या सुभाष घईसाठी नाना पाटेकरसोबत चित्रपट करणे तसे कदाचित फार कसोटीचे वाटले नसेल. अथवा जमून जाईल असा आत्मविश्वास असेल. सुभाष घई दिग्दर्शित चित्रपटांतून आपणास छोटीशी तरी भूमिका मिळावी म्हणून इच्छुक असणारे लहान मोठे कलाकार अनेक, पण नाना पाटेकर तसा नव्हता. दिग्दर्शकाच्या मोठेपणाचा आपल्यावर कसलाही दबाव येऊ न देण्यात ख्यातनाम. प्रसंगी स्पष्टवक्ता, सडेतोड, कारण नाणे खणखणीत.

तीन चार स्टोरी सिटींग/मिटींगनंतर सुभाष घईच्या लक्षात आले, नाना पाटेकरसोबत आपण चित्रपट करण्याचा विचार सोडून द्यावा. येथेही दिग्दर्शक दिसतो म्हणायचे. सुभाष घई अनेक वळणे घेत घेत घडलेला फिल्मवाला आहे. त्याने निर्णय घेतला. चित्रपटाचे नाव खलनायक असेच ठेवायचे, पण पटकथेत बरेच फेरफार करायचे. पटकथाकार राम केळकर व सचिन भौमिक हे सुभाष घई दिग्दर्शित चित्रपटांचे हुकमी पटकथाकार. त्यांनी पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट हा फोकस ठेवून खलनायक लिहिला. सुभाष घईने राखी गुलजार, संजय दत्त, माधुरी दीक्षित, जॅकी श्रॉफ, अनुपम खेर, रमय्या, प्रमोद माऊथो, मंगल धिल्लॉन असे अनेक कलाकार निवडून 'खलनायक'च्या चित्रीकरणास सुरुवात केली. याच रमय्याला कालांतराने आपण बाहुबलीमध्ये पाहिले.

सुभाष घईने याच बहुचर्चित खलनायकचा पुढचा भाग खलनायक २च्या निर्मितीची घोषणा केली यानिमित्त हा फ्लॅशबॅक. त्या काळात सुभाष घई व नाना पाटेकर भेटीचा किस्सा खूप गाजला.

खलनायकमधील संजय दत्त व माधुरी दीक्षित ही जोडी विशेष भूमिकेत कायम ठेवून अनेक नवीन कलाकारांची निवड करीत हा खलनायक २ निर्माण होईल. सुभाष घईच्याच व्हिसलिंग वूड या चित्रपट प्रशिक्षण केंद्रातून शिक्षण घेतलेल्या नवीन चेहऱ्यांना या चित्रपटात संधी मिळाल्यास आश्चर्य नाही. आपल्याकडे शिकलेल्या कलाकारांसाठी आपणच चित्रपट निर्मिती करायला हवी ही भूमिका व भावना अगदी स्वाभाविकच.

खलनायक घोषणेपासूनच गाजला. ते अगदी प्रदर्शित होईपर्यंत तो चर्चेतच होता. एखाद्या चित्रपटाच्या कुंडलीत असे काहीही असू शकते. ते फिल्मी ज्योतिषी सांगू शकत नाहीत.

चित्रिकरण सुरू असतानाच संजय दत्त व माधुरी दीक्षितच्या अफेअरची खमंग चर्चा सुरू झाली. माधुरीच्या चाहत्यांना हा आश्चर्याचा धक्काच होता. संजूबाबा विवाहित (त्याची पत्नी रिचा शर्मा तेव्हा अमेरिकेत कॅन्सरग्रस्त होती), त्याच्याकडे माधुरीने आकृष्ट व्हावे? (तेव्हाची त्याची इमेज बेफिकीर अशीच होती.) छे छे काहीतरीच काय असा माधुरीच्या मध्यमवर्गीय चाहत्यांचा प्रामाणिक व आपलेपणाचा सूर होता. गॉसिप्स मॅगझिनमधून काय वाट्टेल ते रंगवून, खुलवून, फुलवून, शिजवून लिहिले जात होते. त्यांचे ते जणू स्वातंत्र्य. आणि त्यालाच भरपूर वाचक.

चित्रपट पूर्ण होत असतानाच खलनायकच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका व ध्वनिफीत प्रकाशित होताच त्याची गाणी गाजू लागली. सुभाष घई हा चित्रपट गीत संगीत व नृत्य यांचा उत्तम कान (ऐकायला चांगली) व दृष्टी (पडद्यावर पाह्यला आकर्षक) असलेला फिल्मवाला. त्यामुळेच त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गाणी कायमच लोकप्रिय. नायक नहीं खलनायक हू गाजू लागले. आजा साजन आजा, ऐसे तेरी याद आती है, देर से आना जल्दी जाना ही गाणीही लोकप्रिय होत गेली. तोच अलका याज्ञिक व इला अरुण यांनी लोकसंगीतावर आधारित चोली के पीछे क्या है गाण्याने वाद निर्माण केला. तसं पाहता १९९३ हे वर्ष चित्रपटसृष्टीसाठी वादळी. सतत कसले ना कसले वाद होत होतेच. धाडसी अभिनेत्रींची गॉसिप्स मॅगझिनमधील बिनधास्त (तरी ब्युटीफुल) फोटो सेशन गाजत होती. तेरी पॅन्ट भी सेक्सी (चित्रपट दुलारा) अशी गाणी वाह्यात म्हणून वादग्रस्त ठरत होती. चित्रपटसृष्टी व अंडरवर्ल्ड या नात्यावरुन भडका उडाला होता. चित्रपटसृष्टीची प्रतिमा काळवंडली होती. त्यात चोली के पीछे या गाण्याची भर पडली. यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या. राजकीय पक्षांची आंदोलने झाली. असे गाणे म्हणजे सांस्कृतिक पतन असे म्हटले जाऊ लागले आणि याच गढूळ वातावरणात मुंबईतील १२ मार्चच्या बॉम्बस्फोट प्रकरणात संजय दत्तला एप्रिल महिन्यात अटक झाली आणि मोठेच चक्रीवादळ निर्माण झाले. खलनायक चित्रपटाचे प्रदर्शन अडचणीत आले. ते मुद्रित माध्यमांचे दिवस होते. खलनायक चित्रपटाच्या विरोधात त्यात प्रचंड सूर होता. संजय दत्तच्या कारकिर्दीतील हा अतिशय महत्त्वाचा चित्रपट होता, पण वाट सोपी नव्हती. चोली के पीछे क्या है गाण्याचा वाद कायम होताच. त्यातच दिग्दर्शक सावनकुमार यांनी याच चित्रपटाशी स्पर्धा करीत खलनायिका हा चित्रपट पूर्ण केलादेखील. एक चित्रपट अनेक गोष्टी असा खेळ रंगला होता.

अतिशय वादळी वाऱ्यासह मुंबईत ६ ऑगस्ट रोजी खलनायक (मेन थिएटर मेट्रो) आणि खलनायिका (मेन थिएटर ड्रीमलॅन्ड) प्रदर्शित झाले. आणि व्यावसायिक यशही प्राप्त केले. संजय दत्तवर जनसामान्यांचा प्रचंड रोष आहे असे म्हटले जात होते आणि त्यात काहीही गैर नव्हतेच. तरी खलनायक चित्रपट पहायला चित्रपट रसिकांची गर्दी झाली. त्याच खलनायकचा पुढचा भाग खलनायक २ची पटकथा सज्ज आहे.

आज आपण पॅन इंडिया चित्रपट युगात आहोत. एका भाषेतील चित्रपट अन्य अनेक भाषेत डब करून जगभरातील अनेक देशांत प्रदर्शित होत आहेत. त्याच वेळेस आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल माध्यमातून स्मार्ट गुन्हेगारी निर्माण झाल्याच्या बातम्या आपण पाहतोय. सुभाष घई खलनायक २मध्ये हे नवीन जग कसे दाखवणार याची विलक्षण उत्सुकता... १९९३चा हिंदी चित्रपट व त्याचा प्रेक्षक आणि २०२५चा हिंदी चित्रपट व त्याचा प्रेक्षक यात बराच फरक पडलाय. चित्रपट सिंगल स्क्रीन थिएटर्सकडून मल्टीप्लेक्स, ओटीपर्यंत आला आहे याचे सुभाष घईला भान असेलच म्हणा. सुपरहिट चित्रपटाचा पुढचा भाग एवढाच निर्मितीमागे दृष्टिकोन नसावा. अनेक चित्रपट नेमके तेथेच फसतात... म्हणूनच सावधान!








# गायक, संगीतकार गजाननराव वाटवे





मराठी भावगीत गायक व संगीतकार गजाननराव वाटवे यांची आज जयंती. त्यांचा जन्म ८ जून १९१७ रोजी बेळगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचा भिक्षुकीचा व्यवसाय होता आणि ते मिरज संस्थानामध्ये उपाध्याय होते. छोट्या गजाननला लहानपणापासूनच गाण्याची आवड होती आणि उपजत गोड गळ्यामुळे विविधप्रसंगी गाणी म्हणण्यात अग्रेसर असे. गाण्याच्या वेडापायी बेळगाव सोडून ते पुणे येथे आले.

विनायकबुवा पटवर्धन यांनी गजाननरावांची सोय गोविंदराव देसाई यांच्या गोपाल गायन समाजात केली. गजाननरावांनी अर्थार्जनाकरिता शाळा–महाविद्यालयांमध्ये गायनाचे वर्ग घेण्यास सुरुवात केली. त्यांचा गायनाचा पहिला जाहीर कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयात झाला (१९३८). यानंतर त्यांनी विविधप्रसंगांना अनुसरून काव्यगायनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. त्यांना मुंबई आकाशवाणीवर गायनाचा कार्यक्रम करण्याची संधीही मिळाली (१९३९). याचवर्षी त्यांची 'वारा फोफावला' ही ध्वनिमुद्रिका एचएमव्ही कंपनीने काढली. ही पहिलीच ध्वनिमुद्रिका खूप गाजली. यानंतर त्यांच्या अनेक ध्वनिमुद्रिका निघाल्या.

गजाननरावांनी केशवसुत, गिरीश, माधव जुलियन, यशवंत, कुसुमाग्रज, सुरेश भट, गदिमा, राजा बढे, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, श्रीनिवास खारकर आदी प्रतिभावंतांच्या दर्जेदार भावकविता अत्यंत सुरेल चालीत बांधल्या आणि त्या रसिकांसमोर पेश केल्या. हे त्यांनी केलेले काव्यगायनाचे कार्यक्रम खूप गाजले. या कार्यक्रमांमध्ये ते विविध प्रकारची गीते सादर करत असत. राष्ट्रप्रेमाची गीते, मातृप्रेमाची गीते, प्रेमगीते, पाऊस गीते, विडंबन गीते असे विविध प्रकार या कार्यक्रमात असल्याने सर्व प्रकारच्या रसिकांना हे कार्यक्रम आवडू लागले.

गजाननरावांनी जवळपास २०००पेक्षाही अधिक गीते स्वरबद्ध केली, त्यापैकी त्यांनी संगीतबद्ध केलेल्या व गायलेल्या गीतांमध्ये रामाला गं चंद्र हवा (१९५४), हीच राघवा हीच पैजणे (१९५४), मंदिरात आलो तुझ्या दर्शनाला (१९८६), झुंजू मुंजू झालं (१९९३), निरांजन पडले तबकात (१९९९), दोन ध्रुवावर दोघे आपण(१९९९), चंद्रावरती दोन गुलाब (१९९९), घट तिचा रिकामा (२००४), प्रीत तुझी माझी (२००६), नयन खेळले जुगार (२०१०), परीसा हो तुलसी रामायण (२०१४) ही गीते विशेष गाजली. तसेच त्यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांमध्ये गगनी उगवला सायंतारा, कोणता मानू चंद्रमा, कुंभारासारखा गुरू, ती पहा बापूजींची प्राणज्योती, जारे चंद्रा तुडवित जा पवना जा वेगे, चल चल चंद्रा, घर दिव्यात मंद तरी, गेला दर्यापार घरधनी, गावू त्यांना आरती, कधी कुठे न भेटणार, अंतरीची विशाल स्वप्ने, ऐकलात का हट्ट नवा, उठ राजसा घननिळा, आला स्वप्नांचा मधुमास, रघुवीर आज घरी येणार, या धुंद चांदण्यात तू, नाखवा वल्हव वल्हव, तो सलीम राजपुत्र, ते कसे गं ते कसे, परदेशी सजन घरी आले, सुरांनो जावू नका रे ही गीते रसिकप्रिय झाली. दरम्यान प्रभात फिल्म कंपनीशी त्यांचा संबंध आला आणि दहा वाजता या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले. अनेक गीतांना त्यांनी चालीही दिल्या. वाटवे यांनी संगीतबद्ध केलेल्या कर्णमधुर कविता मालती पांडे, माणिक वर्मा, सुमन कल्याणपूर, ज्योत्स्ना भोळे, कुमुदिनी पेडणेकर या गायिकांनी गायल्या आहेत.

गजाननरावांचा विवाह सुषमा यांच्याशी झाला. त्यांना मिलिंद वाटवे आणि मंजिरी वाटवे–चुणेकर ही दोन मुले. गजाननरावांनी आपल्या सुरेल गायनाने मराठीतील अर्थघन भावगीतांना वेगळी उंची प्राप्त करून दिली. ते स्वत:ची ओळख काव्यगायक अशी करून देत असत. त्यांनी भावगीत या गायनप्रकाराचा प्रसार केला आणि सुगम संगीताला मैफलीचा दर्जा मिळवून दिला. कवितेला शोभेल अशी भावस्पर्शी चाल आणि तबला व पेटी या वाद्यांच्या जोडीने माफक संगीताचा वापर करून भावपूर्ण मुलायम आवाजात हे गानसादरीकरण होत असे. याचा सर्वसामान्य रसिकांवर वेगळा प्रभाव पडत असे व ते भारावून जात. त्यांचे गायनाचे कार्यक्रम खूप लोकप्रिय असण्याचे हे एक गमक होते. ते कवितेतील शब्दोच्चाराकडेही लक्ष देत असत. यमक साधण्याकरिता कवितेची अकारण मोडतोड त्यांना पटत नसे. कविता भावपूर्ण, श्रवणीय आणि प्रेक्षणीय करण्याची किमया त्यांच्यामध्ये होती. शाळा–महाविद्यालयातील कार्यक्रम, गणपती उत्सव अशा सर्व लहानमोठ्या प्रसंगात त्यांचे काव्यगायनाचे कार्यक्रम होत असत.

गजाननरावांना दीनानाथ पुरस्कार (१९९३), महाराष्ट्र शासनाचा 'लता मंगेशकर पुरस्कार' (१९९४), वसंतराव नाईक पुरस्कार (१९९५), गदिमा प्रतिष्ठानचा पुरस्कार, युगप्रवर्तक पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले. पुणे येथे १२ डिसेंबर १९६७ रोजी झालेल्या भावगीत गायक संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

गजाननरावांची शिष्य परंपराही मोठी आहे. अनुराधा मराठे, शोभा जोशी, रंजना जोगळेकर, मंजिरी आलेगावकर, रवींद्र साठे इत्यादींनी त्यांचा वारसा पुढे चालविला. गगनी उगवला सायंतारा (१९७१) हे त्यांचे आत्मचरित्र. गजाननरावांनी संगीतबद्ध केलेल्या १०० भावगीतांचा समावेश असलेला निरांजनातील वात हा भावगीतसंग्रह बबनराव नावडीकर यांनी संकलित केला आहे. स्वरानंद प्रतिष्ठान, पुणे ही संस्था वाटवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भावगीत या गायन प्रकारात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीस २०१६पासून पुरस्कार देते. गजाननरावांचे वृद्धापकाळाने पुणे येथे २ एप्रिल २००९ रोजी निधन झाले.

**–शशिकांत कुलथे**
**(मराठी विश्वकोष)**



# पुरी गावच्या महिला बचत गटांची पंढरीची वाट



छत्रपती संभाजीनगरमधील पुरी (ता. गंगापूर) येथील महिलांनी तयार केलेल्या प्लास्टिकच्या घोंगट्या आता तयार झाल्या आहेत. त्या आता आळंदी ते पंढरपूर या वारीच्या मार्गावर विक्रीसाठी उपलब्ध होतील. व्यवसायाच्या निमित्ताने पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या वारकऱ्यांचे पावसापासून रक्षण करुन या महिलांनी पांडुरंग सेवेची अनोखी वाट शोधली आहे.

पुरी गावातील महिला या महिला आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून बचत गटांमध्ये संघटित झाल्या. आणि त्यांनी प्लास्टिकपासून घोंगट्या (पावसापासून रक्षण करणारे पारंपरिक प्रावरण) बनविण्याचा आणि त्या विकण्याचा व्यवसाय सुरू केला. सन २००७पासून त्या हा व्यवसाय करीत आहेत. १४ बचत गटांच्या माध्यमातून ५० ते ६० महिला या व्यवसायाशी जोडल्या गेल्या आहेत. त्यापैकी एक रागिणी महिला बचत गट. सुनिता वसंत गिरी या गटाच्या अध्यक्ष आहेत.

**असा असतो कच्चा माल**

विविध उत्पादनांच्या पॅकींगसाठी प्रिंटेड प्लास्टिक पेपर वापरला जातो. हा पेपर आतून कोटींग असलेला असतो. त्याच्या वरच्या भागात उत्पादनाशी संबंधित माहिती छापलेली असते. त्यातील छपाईत काहीतरी दोष असल्याने कंपन्यांकडून हा कागद रद्दबातल केलेला असतो. हा १५० ते २०० जीएसएम कागद या महिला विकत घेतात. हाच त्यांचा कच्चा माल. हा माल बहुदा मुंबई किंवा गुजरातहून येतो. ५० रुपये किलो या दराने घेतलेल्या एक किलो कच्च्या मालापासून पाच घोंगट्या तयार होतात. त्या किमान ५० ते ६० रुपये प्रति घोंगटी या दराने वारकऱ्यांना विकल्या जातात.

**वारकऱ्यांच्या पसंतीस उतरलेल्या घोंगट्या**

वारकऱ्यांन्या पारंपरिक गोणपाट अथवा घोंगडी (मेंढीच्या लोकरीपासून बनवलेली)पासून बनवलेल्या घोगट्यांऐवजी ही घोंगटा अधिक योग्य वाटते, कारण ही वजनाला हलकी असते. त्यामुळे डक्यावर घेऊन चालत जाणे सहज शक्य होते. वारकऱ्यांसोबत असलेली थैलीही त्यात सहज सांभाळली जाते, शिवाय पाऊस उघडल्यावर सहज घडी करून थैलीत बाळगता येते. रात्री झोपतांना अंथरुणासाठीही वापरता येते.

**शिलाई ते सिलिंग**

आधी या महिला घोंगटा शिलाई मशिनवर शिवत असत. आता त्यांनी सिलिंग मशिन आणली आहे. त्याद्वारे घोंगटीची दोन टोके यंत्रावर चिकटवली जातात. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढला आहे. यंदा या महिलांनी आठ टन कागद मागवला आहे. घोंगट्यांसोबत त्या याच कागदाची ताडपत्रीही बनवतात. ही ताडपत्री शेतकरीवर्ग आपल्या शेतीमालाला झाकून ठेवण्यासाठी वापरतात. आतापर्यंत चार टन कागदाची ताडपत्री यंदा विक्री झालीसुद्धा. आता लवकरच घोंगट्या विक्रीसाठी आळंदीकडे रवाना होतील. काही व्यापारीदेखील हा माल विकत घेऊन जातात.

**'माविमं'ची भूमिका**

दरवेळी या महिला माविमकडून अर्थसहाय्य घेतात आणि त्याद्वारे कच्चा माल खरेदी करतात. त्यातून घोंगट्या तयार करून दरवर्षी त्या विक्रीसाठी नेतात आणि नफा कमावून त्यातून कर्ज फेड करतात. आतापर्यंत २० लाख रुपयांचे कर्ज त्यांनी घेतले आहे. त्याची त्या नियमित फेड करत असतात. दरवर्षी त्यांना ५० टक्के रक्कम नफा म्हणून शिल्लक राहते. वारीच्या कालावधीतच विक्री होत असल्याने चार महिने आधीपासून ते कामाला लागतात. वारीचा महिनाभर विक्री करुन आपल्या घरी परततात. पदरी असतो नफा आणि वारकऱ्यांची पर्यायाने पांडुरंगाची सेवा केल्याचे संचित. **(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र)**

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रम

## अलिबागमध्ये वृक्षारोपण



**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सहयोग पतसंस्था अलिबाग यांच्या वतीने बेलकडे गावात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण रक्षण व वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम सामाजिक भान जपत राबवण्यात आला.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप साहेब, अलिबाग तालुका सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील साहेब यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोग पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर होते. त्यांच्या समवेत उपाध्यक्ष संजय पाटील, संचालक सुनील तांबडकर, निळकंठ केमकर, चिंतामणी मकू, मोहन वैद्य, श्रावणी मगर, व्यवस्थापक वैभव बोर्लीकर, तसेच पतसंस्थेचा संपूर्ण कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

याशिवाय कार्यक्रमाला बेलकडे गावचे ग्रामस्थ, जिल्हा माजी होमगार्ड समादेशक ॲगड. के. डी. पाटील सर, त्यांचे सहकारी, आणि पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या उपक्रमातून समाजात पर्यावरण रक्षण, हरितनिर्मिती आणि जैवविविधतेचे जतन यांचा संदेश देण्यात आला. आगामी काळात सहयोग पतसंस्थेच्या वतीने असेच अनेक सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती अध्यक्ष योगेश मगर यांनी दिली.



**रोहा : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रोहा कुणबी समाज भवन येथे वृक्षारोपण करताना ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, कोळी समाज नेते नवनीत डोलकर, कुणबी समाज नेते शशिकांत कडू, सुहास खरीवले, पत्रकार महादेव सरसंबे आदी उपस्थित होते.**

## मध्य रेल्वेच्या गो ग्रीन उपक्रमास शुभारंभ

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहाने आणि पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी दृढ वचनबद्धतेने साजरा केला. या वेळी, गो ग्रीन उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ, शपथविधी आणि वृक्षारोपण मोहिमेसह अनेक हरित उपक्रम हाती घेण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हॉल येथे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी सर्व प्रमुख विभाग, मुख्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह पर्यावरण शपथ घेतली. रेल्वे बोर्डाचे सदस्य ट्रॅक्शन अँड रोलिंग स्टॉक (एमटीआरएस) यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शपथ दिली.

या वेळी, महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी जीवन टिकवून ठेवण्यात झाडांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. उंच झाडे, त्यांच्या पर्यावरणीय फायद्यांव्यतिरिक्त, वीज पडताना लोकवस्तीच्या भागातून विद्युत प्रवाह सुरक्षितपणे वळवून नैसर्गिक संरक्षक म्हणून कशी काम करतात यावर त्यांनी भर दिला. त्यांनी वड आणि पिंपळ यासारख्या स्थानिक वृक्षांच्या अद्वितीय गुणधर्मांवरदेखील प्रकाश टाकला, ज्यांच्याकडे प्रचंड पर्यावरणीय मूल्ये आहेत. वृक्षांनी मानवतेला दिलेल्या मूक आणि निःस्वार्थ सेवेचे महाव्यवस्थापकांनी कौतुक केले.

ऑक्सिजन, सावली, निवारा आणि हवामान बदलाच्या प्रतिकूल परिणामांपासून संरक्षणाची एक महत्त्वाची भूमिका म्हणून काम करण्यासह त्यांनी सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामात पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार पद्धतींचा समावेश करण्याचे आणि भावी पिढ्यांसाठी निसर्गाचे रक्षण करण्यासाठी शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

या वेळी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी प्रधान विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण मोहिमेचे नेतृत्व केले ज्यामध्ये १०० रोपे लावण्यात आली. येत्या काळात ५०० रोपांचे मोठे लक्ष्य साध्य केले जाणार आहे, जे मध्य रेल्वेच्या पर्यावरणपूरक वचनबद्धतेला बळकटी देईल.

श्री मीना यांनी प्लास्टिकला पर्यावरणपूरक पर्यायांवरील एका विशेष प्रदर्शनाचे उद्घाटनदेखील केले. प्रदर्शनात डाळी आणि विविध प्रकारच्या प्लास्टिकपासून बनवलेल्या खाद्य कटलरी प्रदर्शित केल्या गेल्या, ज्यामुळे पर्यटकांना त्यांच्या पर्यावरणीय परिणामांची कल्पना आली. जागरूकता वाढवण्यासाठी आणि वर्तन बदलाला प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेल्या या प्रदर्शनात सर्व भागधारकांना प्लास्टिकला नाही म्हणण्यास आणि या वर्षीच्या जागतिक थीम – प्लास्टिक प्रदूषणाचा अंत मध्ये सामील होण्यास प्रोत्साहित केले गेले.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी लोकमान्य टिळक टर्मिनस परिसरात जागरूकता रॅलीचे नेतृत्व केले. या रॅलीमध्ये रेल्वे कर्मचारी, भारत स्काउट्स अँड गाईड्स आणि नागरी संरक्षण पथकाचा उत्साही सहभाग होता. पर्यावरणाचे संवर्धन आणि प्लास्टिक प्रदूषण दूर करण्याच्या तातडीच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या रॅलीचा उद्देश होता. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरही अशाच प्रकारची रॅली काढण्यात आली, ज्यामध्ये स्टेशन कर्मचाऱ्यांनी उपस्थिती लावली, जिथे प्रवाशांना जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.



## उसर खुर्द विद्यालयात ‘एक विद्यार्थी एक झाड’

**माणगाव : प्रतिनिधी**

पर्यावरणाची होणारी हानी, जंगलतोड व वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षांची जोपासना करणे अत्यंत आवश्यक आहे. तापमानवाढ रोखण्यासाठी वृक्ष आवश्यक आहेत. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व ओळखून ५ जून हा दिवस पर्यावरणदिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह पालक वर्गानी वृक्षारोपण केले.

विद्यालय परिसरात या निमित्ताने फुलझाडे, वृक्षांची लागवड करण्यात आली. या वेळी मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक गुजर सर व अमोल तोडकरी तसेच पालक–शिक्षक संघाचे सदस्य शांताराम नटे, तळेगावच्या सरपंच चाळके, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारची वृक्ष लागवड व संवर्धन करून विद्यार्थ्यांनी हिरवाई निर्माण केली आहे. पर्यावरणदिनानिमित्त ’एक विद्यार्थी, एक झाड’ उपक्रमाचे पालक व पर्यावरणप्रेमींनी कौतुक केले आहे. शाळेतील विद्यार्थी व पालकांशी संवाद साधून त्यांना कचऱ्याचे वर्गीकरण, विशेषतः प्लास्टिकचा वापर टाळणे, प्लास्टिकचा पुनर्वापर या संदर्भात कृतिशील उपक्रमांतर्गत शाळेने जाणीव जागृतीसुध्दा यापूर्वी केली आहे.



**माणगाव : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत दाखणे हद्दीतील खर्डी बुद्रुक येथे विश्वास उभारे प्रतिष्ठानमार्फत वृक्षारोपण करण्यात आले.**

## मुरूड समुद्रकिनारी श्रमदानातून स्वच्छता शिबिर



**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मुरूड–जंजिरा नगर परिषद वतीने समुद्रकिनाऱ्यावर भव्य स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून स्वच्छता मोहिमेत नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांच्यासह प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे, शहर अभियंता अनिकेत वाजे, रचना सहाय्यक अनिकेत भोसले, तसेच सिटी को–ऑर्डिनेटर सचिन कोरके पाटील, शहरस्तरीय अभियंता जयकृष्ण भिसे यांनीदेखील सहभाग घेतला.

या श्रमदान मोहिमेत नगर परिषदेसोबतच सर्व कर्मचारी, अधिकारी, सफाई कामगार व स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. संपूर्ण समुद्र किनाऱ्याचा परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. प्लास्टिक, काच, टाकाऊ वस्तू, नारळाच्या झाप व इतर घनकचऱ्याचा सुमारे ५.५ टन कचरा उचलण्यात आला.



**रोहा : गुजराती समाजाच्या वतीने श्री धावीर मंदिराच्या परिसरात पर्यावरण दिनानिमित्त गुलाबाची व शोची झाडे लावण्यात आली. या वेळी नगर परिषदेचे माजी गटनेते महेंद्र गुजर, ललित, विलास गुजर, डॉ. कन्हैया मेहता, गीता मेहता व शिल्पा गुजर यांच्यासह गुजराती समाजातील बंधू–भगिनी उपस्थित होते.**

## खालापुरात मोटरसायकल अपघातात दोन जण गंभीर

### एक किरकोळ जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील कलोते गावाजवळ असणाऱ्या रिंकी हॉटेलजवळ कार आणि बाईकचा अपघातात एक जण जखमी, जखमीला ग्रामीण रुग्णालय खालापूर येथे उपचार करून पुढील उपचारासाठी एमजीएम कामोठे येथे हलवण्यात आले. पार्थ पाटील २३ अलिबाग असे जखमी बाईकस्वाराचे नाव आहे.

दुसरा अपघात हाळ गावच्या हद्दीत झाला. मोटारसायकल घसरून पडल्याने बाईकस्वार जखमी झाला. ही घटना सकाळी १० वा सुमारास घडल्या. तिसऱ्या घटनेत खोपोली–पेण मार्गावरील आपटी गावच्या हद्दीत जनरेटर वाहक गाडी अंधारात जात असताना मोटरसायकल स्वार पाठीमागून धडकून गंभीर जखमीं झाला. जखमीला खोपोलीतील जाखोटिया रुग्णालयात व नंतर प्रकृती गंभीर असल्याने नवी मुंबई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना रात्री १०च्या सुमारास घडली.



## माणगाव तालुक्यात बकरी ईद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात शनिवारी ईद–उल–झुआ म्हणजेच बकरी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवानी एकमेकांना गळाभेट आलिंगन देत बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच हिंदू बांधवांनीही मुस्लिम बांधवांची घरोघरी भेट घेऊन तसेच दूरध्वनीवरून बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यादिवशी माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## काजूवाडीत घराला आग

**खालापूर :** खोपोलीतील काजूवाडी येथील समाज मंदिराच्या जवळ असणाऱ्या घराला आग लागली. या आगीत घरात असणारा व्यक्ती ४० टक्के भाजल्याने नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने नवी मुंबई येथील बर्न रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्वच सामान जळून खाक झाले.


**पाहिजेत**

**नामांकित प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी मध्ये पनवेल या ठिकाणी एक जागा भरणे आहे.**

| पदनाम | संख्या |
|---|---|
| १) सिक्युरिटी सुपरवायझर | ०१ |

**अनुभवास प्राधान्य दिले जाईल/( Ex- Army)**

**मोबाईल नं. :** ७०२०८९६३५३ ९६६५५३२९५०


## काकळघर ग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील शिवसेनेची सत्ता असकेत्ता काकळघर ग्रामपंचायतीचे नूतन कार्यालय इमारतीचा शुभारंभ शिवराज्यभिषेक दिनानिमित्ताने झाला.



या वेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थितीसह भाजप जिल्हा सरचिटणीस अँड महेश मोहिते, शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरतशेठ बेलोसे, जेष्ठ शिवसैनिक सि.एम. ठाकूर, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, मुरूड तालुका संपर्क प्रमुख चद्रकांत मोहिते, शिवसेना मुरूड उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, शिवसेना मुरूड उपतालुका प्रमुख मनोज कमाने, विस्तार अधिकारी अशोक दांडेकर, विभाग प्रमुख सुरेश ठाकूर, मोहन ठाकूर,सुरेश पालवणकर, सतेज ठाकूर, काकळघर ग्रा.प.माजी सरपंच साक्षी ठाकूर, मुरूड तालुका युवासेना प्रमुख अमोल लाड, युवासेना उपतालुका प्रमुख विकी वेगस, शिवसेना मुरूड महिला संघटिका निर्मला म्हात्रे, उपसंघटक वैशाली रोटकर, बोर्ली ग्रा.प.सरपंच सपना जायपाटील, सहसंपर्क प्रमुख मंदा ठाकूर, गजानन दिवेकर, नथुराम कांबळी, तसेच कार्यक्रमाचे निमत्रंक काकळघर ग्रा.प. सरपंच स्वस्तिक ठाकूर, उपसरपंच सुरक्षा सुरेश ठाकूर, ग्रा.प.सदस्य निशांत दांडेकर, मंगेश कुलवे, हर्षला आग्री, सुदेश पाडावे, गोविंद ठाकूर, ग्रा.प.सदस्य काळीताई ठाकूर, संपदा कांबळी, रूपाली महाडिक तसेच ग्रा.प. अधिकारी संगिता पेढवी, तसेच मोठ्या संख्येने काकळघर ग्रा.प. अंतर्गत ग्रामस्थ आदीची उपस्थिती होती.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे उमरोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट/सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३ | ३ | जिरायत ०–४४–४० पो. ख.०–१३–७० एकूण ०–५८–१० पैकी ०–२०–०० | ४.८१ | अशोक दिनकर डांगरकर |

**पनवेल.**
**दिनांक ०६/०६/२०२५.**

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
**शॉप नं. १३. वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर ४. सेक्टर नंबर ५. गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

## निवडक

### पादचाऱ्याचा मोबाईल लंपास

**पनवेल :** वार्ताहर रस्त्यावरून जाणाऱ्या तरुणाच्या हातातील मोबाईल हिसकावून चोरटे बाईकवरून पसार झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मयुरेश काळदंते हे पुणे येथे राहत असून ते खारघर येथे त्यांच्या बहिणीला भेटण्यासाठी निघाले. सेक्टर १० येथे पायी फोनवर बोलत जात असताना दोन अनोळखी व्यक्ती बाईकवर आले आणि त्यांच्या हातातील ८० हजार रुपयांचा मोबाईल हिसकावून ते पळून निघून गेले.

### विजय तायडे यांची नियुक्ती

**पनवेल :** रेल्वे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी



विजय तायडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी संजय चव्हाण हे कारभार पाहत होते, परंतु त्यांची बदली मुंबई येथे होवून त्यांच्या जागी मुंबई येथे कार्यरत असणारे विजय तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी विजय तायडे यांनी शहर पोलीस ठाण्याचासुद्धा कारभार पाहिला असल्याने त्यांना पनवेल रेल्वे परिसरातील अधिक माहिती आहे. त्यामुळे या माहितीचा फायदा या भागातील गुन्हेगारी रोखण्यास त्यांना होणार आहे.

### भाजपतर्फे वाशीत वृक्षारोपण



**नवी मुंबई :** भाजप नवी मुंबई जिल्हा आयोजित जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वाशी सेक्टर ३० येथे आयोजक राजेश राय यांच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी ३९ प्रकारचे विविध झाडे लावण्यात आली. या वेळी कोकण विभाग प्रदेश संयोजक अभिजित पेडणेकर, दत्ता घंगाळे, सुभाष विश्वकर्मा, अरविंद उपाध्याय, विनोद शाह, विजय सिंह, अतुल तिवारी, निसर्गप्रेमी तानाजी फणसे, केशव कुंज आणि बालाजी टावरमधील रहिवासी उपस्थित होते.

# धोकादायक इमारतीवर कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**



तुर्भे येथील रामतनु मैदान शेजारी प्लॉट-३३२वर असलेली इमारत धोकादायक स्थितीत असल्याने, पावसाळ्यात ही इमारत कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्यात दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने आपल्या स्थरावर कार्यवाही करावी, अशी लेखी मागणी तुर्भे गावातील नागरिकांना पालिका आयुक्तांकडे केली आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नवी मुंबई महापालिका शहरातील धोकादायक इमारतीचा सर्व्हे करण्यात येतो पावसाळ्यात इमारत कोसळून दुर्घटना घडु नये म्हणून पालिकेकडून प्रयत्न केले जातात चालु वर्षात पालिके कडून शहरातील धोकादायक इमारतीचा सर्व्हे करण्यात यात ५२७ इमारती धोकादायक असल्याचे पालिकेने जाहीर केले आहे. यात ३०वर्ष पुर्ण झालेल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल पालिकेच्या नगर रचना विभागाकडे सादर करण्यास सांगितले आहे. तुर्भे सेक्टर -२२, येथील प्लॉट नंबर -३३२ वर असलेली इमारत धोकादायक स्थितीत आहे.

या इमारतीला लागून रामतनु मैदान असल्याने या ठिकाणी लग्न समारंभ, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम, क्रिकेटआणि अन्य खेळ खेळले जातात तसेच, जवळ असलेल्या शाळेतील विद्यार्थी इमारतीच्या बाजूने ये-जा करत असतात महापालिकेने जाहीर केलेल्या धोकादायक इमारतीच्या यादी सादर इमारतीचा समावेश आहे. सध्या पावसाने उसंत घेतली असली तरी नजिकच्या काळात पडणाऱ्या पावसात सदर इमारत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पावसाळ्यात दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने सदर इमारती बाबत योग्य कार्यवाही करावी, अशी लेखी मागणी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांच्या सह तुर्भेगावातील नागरिकांनी पालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्याकडे केली आहे.

## वासांबे ग्रामपंचायतीकडून रोप लागवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधुन एक पेड माँ के नाम ही संकल्पना कार्यान्वित केली आहे.

या संकल्पनेला अनुसरुन ग्रुप ग्राम पंचायत वासांबे मोहोपाडा यांच्यावतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत मोहोपाडा तलाव व आसपासच्या परिसरात आंबा रोपे-३०, जांभूळ रोपे-३०, बांबूची रोपे-३०, लिंबाची रोपे-३०, सिताफळ रोपे-३० या रोपांची लागवड सरपंच उमा संदीप मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, सदस्या ताई पुंडलिक पवार, सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत आदीसह ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आली.

या वेळी एक पेड माँ के नाम संकल्पनेनुसार मोहोपाडा तलावाच्या मोकळ्या जागेवर सरपंच उमा मुंढे यांच्या मातोश्री प्रभावती विठ्ठल पाटील यांच्या नावे आंबा रोपांची लागवड करण्यात आली. या वेळी ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## सायबर अटक दाखवून वृद्धाकडून आठ लाख उकळले

**नवी मुंबई : बातमीदार**

मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवून वृद्धाचे आठ लाख रुपये लुटल्याची घटना समोर आली आहे. यासाठी सलग चार दिवस त्यांचे सायबर गुन्हेगारांकडून शोषण सुरू होते. या प्रकरणी चौघांवर एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीवूडमध्ये ८१ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. २९ मे रोजी त्यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून तो मुंबईच्या डेल्टा प्रोटेक्शन बोर्डमधून बोलत असल्याचे सांगितले. त्याने मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचा आरोप करत वृद्धाला कारवाईची भीती दाखवली. त्यानंतर वेगवेगळ्या व्यक्तींनी त्यांना फोन करून अटकेच्या कारवाईची भीती दाखविली. सायबर गुन्हेगारांनी त्यांचा चार दिवस मानसिक छळ केला, मात्र त्यांच्या धाकाला बळी पडून फसवणूक झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणाचा तपास एनआरआय पोलीस करत आहेत.



## आदई डोंगरावर वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी आदई डोंगर पनवेल येथे कृष्ण रुख्मिणी ट्रस्टतर्फे वृक्षारोपण केले.

निरोगी पर्यावरण, निरोगी मानव, जीवन आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. शुध्द, सुरक्षित व सजीव पर्यावरण हे निरोगी जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. जर पर्यावरण प्रदूषित असेल तर त्याचा थेट व अप्रत्यक्ष परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतो, हे सिद्ध झाले आहे.

एक मोठा संदेश पाणी, झाडे, वीज, कागद वाचवा, वाहना ऐवजी सायकलचा वापर तसेच कचरा पेटीचा ही करा. टाकावू वस्तूंचे रिसायकल होणे गरजेच आहे. प्लास्टिकचा वापर टाळून तुम्ही पृथ्वीला मदत करू शकता.

या वेळी उत्तम ढेबे यांच्या नेतृत्वात डॉ. कृष्णा देसाई बोराटे, तळेकर, कृष्णकुमार, सिद्धी देसाई, पोतदार इ.यांनी सहभागी होवुन स्वतः झाडे लावली.

## एक पेड माँ के नाम अभियानांतर्गत वृक्षारोपण

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक पर्यावरण दिनापासून एक पेड माँ के नाम' ही संकल्पना सुरू करण्यात आली आहे. आईच्या नावाने एक झाड प्रत्येकाने लावणे असा या योजनेचा उद्देश असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाला सुरुवात केली आहे.

त्या अनुषंगाने वडघर ग्रामपंचायत प्रशासक मुकेश कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष पवार यांनी या अभियांनांतर्गत विविध जातीच्या ३० वृक्षांची केली लागवड केली. वृक्षलागवड कार्यक्रमाला वडघर ग्रामपंचायत प्रशासक, मुकेश कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष पवार, कृषी विस्तार अधिकारी ढोक मॅडम, पनवेल पंचायत समिती सहाय्यक अभियंता अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सद्यस्थितीत बदलत्या हवामान बदलाचा परिणाम सजीवसृष्टीसह अन्य क्षेत्रांवरही होत आहे. अशा स्थितीत वृक्ष लागवड महत्त्वाची मानली आहे, जेणेकरून पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. म्हणून एक पेड माँ नाम हे अभियान सुरू केले आहे.



**पनवेल : आदित्य दृष्टी सामाजिक विकास परिवाराचे संस्थापक कॅप्टन अंशु अभिषेक यांच्या 'वो घर जो मंदिर था' या पुस्तकाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी प्रकाशन करण्यात आले. या वेळी पागोटे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुनील पाटील, फुंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मनोहर म्हात्रे, प्रशांत भोईर, ग्रामपंचायत सदस्य नितीन म्हात्रे, अजय जैन, सुधा सिंग आदी उपस्थित होते.**



## डेंग्यू नियंत्रणासाठी शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

सद्यस्थितीत अवकाळी पाऊस येत-जात आहे. हे वातावरण हिवताप/डेंग्यूसारखे आजार पसरविणाऱ्या डासांसाठी पोषक आहे. हिवताप/डेंग्यू सारखे आजार पसरविणाऱ्या डासांची उत्पत्ती मुख्यत्वे घरांतर्गत व घराभोवताली स्वच्छ साचलेल्या पाण्यामधील स्थानांमध्ये होत असते, त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात आरोग्य विभागाच्या वतीने विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रांतर्गत पावसाळा कालावधीत प्रत्येक आठवड्याला एक दिवस विशेष हिवताप /डेंग्यू जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

## नवी मुंबईत लोकसहभातून वृक्षारोपण मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ५ जून २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात व व्यापक लोकसहभागातून भव्यतम वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

महानगरपालिकेच्या आठही विभाग कार्यालय क्षेत्रात राबविण्यात आलेल्या या वृक्षारोपणावेळी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरणप्रेमी नागरिक, शिक्षक, विद्यार्थी, बचत गटांच्या महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्या सक्रिय सहभागातून प्राधान्याने देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

सीबीडी बेलापूर मधील पारसिक हिल येथे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते, सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरंगी, चिंच, आवळा, जांभूळ, हादगा, बांबू अशा देशी प्रजातीच्या वृक्षांची लागवड करून वृक्षारोपण मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास आगाखान एजन्सी फोर हॅबिटॅट इंडिया, जन स्मॉल फायनान्स बँक, रोटरी क्लब, महिला बचत गट, केबीपी कॉलेज वाशी, एस के कॉलेज खारघर व एस आय इ एस कॉलेज नेरूळ येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानिमित्त घणसोली येथे शेतकरी शिक्षण मंडळ शाळेजवळील मोकळ्या जागेमध्ये तसेच सेंट्रल पार्क, सेक्टर ३



येथे वृक्षारोपण समारंभ अत्यंत उत्साहात आयोजित करण्यात आला होता. याठिकाणी नानारंगी फुलांनी सजवलेल्या पालखीत वृक्षरोपे ठेवून वृक्षदिंडीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग घेत वृक्षसंपदेचे रक्षण करण्याची मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली.

नेरूळ विभागात रायन इंटरनॅशनल सेक्टर १९, नेरूळ येथे रस्त्याच्या कडेला आणि डि. वाय.पाटील स्टेडियमसमोरील हरित पट्ट्यामध्ये, वाशी विभागात छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून सागर विहार सेक्टर ८ कडे जाणाऱ्या सायकल ट्रॅकच्या बाजूला, तुर्भे विभागात नानासाहेब धर्माधिकारी उद्यान, सेक्टर १३ सानपाडा, संत शिरोमणी उद्यान, सेक्टर ७ सानपाडा आणि स्वामी मोहनानंद गिरी उद्यान, सेक्टर ४ सानपाडा येथे देशी वृक्षरोपांची लागवड मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या सहयोगातून करण्यात आली.

अशाच प्रकारे कोपरखैरणे विभागात सेक्टर १४ येथील निसर्ग उद्यानात, ऐरोली विभागात यशवंतराव चव्हाण उद्यानात, दिघा विभागात साने गुरुजी उद्यान आणि संत निरंकारी भवनसमोरील उद्यानात देशी वृक्षरोपांची लागवड नागरिक आणि विद्यार्थी यांच्या उत्साही सहभागातून करण्यात आली.

अशा प्रकारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध विभागांमध्ये प्रामुख्याने देशी प्रजातीच्या जांभूळ, आंबा, करंज, ताम्हण, कडुनिंब, पेरू, पारिजातक, चाफा, आवळा, फणस, पेरू, लिंब, बकुळ, बहावा, कांचन, अनंत, पिंपळ अशा देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

महानगरपालिकेकडून वृक्षरोपे उपलब्ध करून घेऊन विविध सोसायट्या, शिक्षण संस्था, वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, मंडळे, महिला संस्था-मंडळे यांच्यामार्फतही मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करण्यासोबतच लावलेल्या वृक्षांचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली जबाबदारी असल्याचे लक्षात घेत त्यादृष्टीनेही सतर्क राहण्याचे या कार्यक्रमांवेळी सूचित करण्यात आले.

## पोलीस पाटीलांना पोलिसांकडून सूचना



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांच्या मासिक बैठकीमध्ये वपोनि गजानन घाडगे यांनी आगामी सण, उत्सव लक्षात घेवून महत्वाच्या सूचना केल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने आगामी सण उत्सव जसे बकरी ईद, वटपोर्णिमा त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती अनुषंगाने आपत्कालीन संपर्क क्रमांक देण्यात आला. तसेच गावातील अडीअडचणीवर चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. त्याप्रमाणे गावातील व परिसरातील संशयित वस्तू, वाहने, व्यक्ती याची माहिती पोलिसांना देणे, अवैद्य धंद्यांची माहिती देणे, भाडेकरूंची माहिती देणे बाबत सोसायटी पदाधिकाऱ्यांना माहिती देणे, त्याप्रमाणे डायल ११२, सायबर क्राईम हेल्पलाईन नंबर - १९३०, कोस्टल गार्ड हेल्पलाईन नंबर- १०९३ आदींची माहिती या वेळी देण्यात आली.

प्रामुख्याने वपोनि गजानन घाडगे यांनी आवश्यक त्या सूचना व उपस्थित ४१ पोलीस पाटलांना मार्गदर्शनसुद्धा केले.

## युईएस कॉलेजच्या टीवायबीएससी आयटीचा निकाल ९७ टक्के

**उरण : वार्ताहर**

युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँण्ड टेक्नॉलॉजीच्या टीवायबीएससी आयटी २०२४-२५चा ९७ टक्के लागला. यात कुशल रमेश म्हात्रे याने सीजीपीए : ९.५७ टक्के मिळवून प्रथम क्रमांक, काव्या देवांग धंधुकियाहिने सीजीपीए : ९.५२ टक्के मिळवून द्वितीय क्रमांक तर मानसी दिनेश वर्तक हिने सीजीपीए : ९.४७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

यंदाचा युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँण्ड टेक्नॉलॉजीच्या टी.वाय.बी.एससी.आयटीचा निकाल हा केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मक व उल्लेखनियही आहे. म्हणूनच युईएसच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. ह्या यशात विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे आईवडिल तसेच युईएसचे कमिटी मेंबर्स, सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, सर्व शिक्षक ह्यांचाही सहभाग आहे.

युईएसचे कमिटी मेंबर्स तसेच सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य, स्कूल अँण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्य, सिनीयर कॉलेजच्या विभागप्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक, पूर्व प्राथमिक, विभागातील पर्यवेक्षिका यांच्याकडून पास झालेल्या सर्व गुणवान व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्यावर मेहनत घेणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.


जीवेत् शरदः शतम्!

सचिन भोपी

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

सुनील साळवे

# कर्जतमध्ये शासकीय आढावा बैठक



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय कामांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत ३२ शासकीय विभागांचा आढावा घेण्यात आला. विकासकामांचा दर्जा, प्रलंबित कामे, अडथळे, उपलब्ध निधी आणि जनतेच्या तक्रारी यावर सखोल चर्चा करण्यात आली आणि त्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस आमदार महेंद्र थोरवे, प्रांताधिकारी प्रकाश सकपाळ, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, माथेरानचे अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, वन परीक्षेत्र अधिकारी समीर खेडेकर, सहाय्यक निबंधक शरयू सामंत, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, जिल्हा संघटक संभाजी जगताप, भाजप विधानसभा समन्वयक दिलीप बेहेरे, जिल्हा संपर्कप्रमुख विजय पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख पंकज पाटील, तालुकाप्रमुख सुदामदादा पवाळी, तालुका संघटक सुनील रसाळ, तालुका संपर्कप्रमुख दिलीप ताम्हाणे, सुरेश टोकरे, माजी नगरसेवक ॲड. संकेत भासे, प्रसाद थोरवे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, विकासकामांमध्ये शासकीय यंत्रणांनी अधिक गतीने व समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्य सेवा यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा खपवून घेतला जाणार नाही. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे तत्काळ बुजवावेत, वीज खांब आणि विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी. कृषी क्षेत्रात झालेल्या नुकसानीबाबत संबंधित खात्यांनी तातडीने कार्यवाही करावी.

आमदार महेंद्र थोरवे यांनी या वेळी २९ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील मुद्द्यांचा संदर्भ देत म्हटले की, शासन आणि प्रशासन एकत्र आले तरच विकासाला गती मिळते. आपण टीमवर्कच्या माध्यमातून काम केले पाहिजे. स्थानिक समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत, असेही ते म्हणाले. त्यांनी कर्जत तालुक्याला पर्यटन तालुका घोषित करण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली आणि सर्व विभागांनी यासाठी परस्पर समन्वय ठेवावा, असे आवाहन केले.

# रोह्यातील शिवसृष्टीचे लोकार्पण



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा-अष्टमी नगर परिषदेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या देदीप्यमान इतिहासाची आठवण करून देणाऱ्या शिवसृष्टी या भव्य प्रकल्पाचे लोकार्पण महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. शिवसृष्टीच्या माध्यमातून नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, नगर परिषद मुख्याधिकारी अजयकुमार एडके तसेच संतोष पोटफोडे, मधुकर पाटील, समीर शेडगे, विनोद पाशिलकर, सुरेश मगर, महेश कोलटकर आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिवसृष्टीमध्ये स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्यात आल्या असून त्यातून महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि धैर्याचे दर्शन घडते. हे किल्ले केवळ स्थापत्य नव्हे, तर स्वाभिमान, स्वतंत्रता आणि मराठी अस्मितेचे प्रतीक आहेत, असे प्रतिपादन मंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी केले.

# चौक ग्रामपंचायतीकडून बाधित शेतकऱ्यांना दिलासा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक, तुपगाव, पाली खुर्द परिसरातील काहींच्या गटाराचे सांडपाणी नैसर्गिक नाल्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीन नापीक झाल्या आहेत. याबाबत शेतकरी यशवंत सकपाळ यांनी चौक ग्रामपंचायतीला पत्र दिले होते. त्याची दखल घेत ग्रामपंचायतीकडून शेतीची पाहणी करून लवकरात लवकर या ठिकाणी आवश्यक ते काम सुरू करणार असल्याचे लेखी आश्वासन देण्यात आले आहे.

खालापूर पंचायत समिती शाखा अभियंता अनिल जाधव, अल्पना जाधव यांनी ३ जूनला बाधित शेतकऱ्यांच्या शेतीची व नुकसान स्थळाची पाहणी केली आणि संबंधित ग्रामपंचायतींना बाधित शेतकऱ्यांना टोकाचे पाऊल उचलण्यापासून परावृत्त करून सहकार्य करावे, असे कळविण्यात आले.

शासकीय व ग्रामपंचायतीचे अधिकारी यांनी जागेची पाहणी करून झाल्यानंतर आमदार महेश बालदी यांच्या ग्रामनिधी फंडातून संबंधित काम पूर्ण होणार असल्याचे बाधित शेतकरीवर्गास सांगितले आहे. त्याचबरोबर स्मशानभूमीजवळ साकव बांधण्यात येणार आहे तसेच बाधित शेतकऱ्यांच्या शेतातून गटार काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

■ *नागरिकांसाठी शासकीय योजना थेट दारात!*

# शिवसन्मान शिबिरास श्रीवर्धनमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. नागरिकांच्या दैनंदिन शासकीय गरजांवर उपाय म्हणून आयोजिलेल्या या विशेष शिबिरामुळे शासकीय सेवा थेट गावागावात पोहचली.

या शिबिराचे आयोजन उपविभागीय अधिकारी महेश पाटील आणि तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. गालसुरे आणि बोर्ली पंचतन या गावांमध्ये हे शिबिर पार पडले. यामध्ये शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला.

शिबिरात लाभार्थ्यांना रहिवासी, उत्पन्न आणि जात प्रमाणपत्रे, नवीन आणि दुरुस्त रेशनकार्ड वाटप तसेच विविध सामाजिक योजना जसे की संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना यांचा लाभ देण्यात आला. अनेक नागरिकांनी त्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कामांसाठी समाधान व्यक्त केले. शिबिराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नायब तहसीलदार मनोज माने, मंडळ अधिकारी कमलाकर गायकवाड, तलाठी सुजाता पातोड आणि मनोज जोंधळे, कोतवाल रवींद्र साखरे तसेच श्रीओम गांधी यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या समन्वयातून शिबिर सुरळीतपणे पार पडले.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या मनात शासनाबद्दल विश्वास वाढला असून ग्रामीण भागातील जनतेसाठी शासनाचे दरवाजे खुले असल्याचा सकारात्मक संदेश मिळाला आहे. भविष्यात अशाच प्रकारच्या उपक्रमांमुळे ग्रामीण जनतेला अधिक सोयीसुविधा मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मोर्बा युनायटेड स्कूलकडून रोपांचे वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कूल येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा कारण्यायत आला. या दिनाचे औचित्य साधून शासकीय स्थळांना सदिच्छा भेट देऊन विविध रोपे वाटप करण्यात आली.


यामध्ये सर्वप्रथम माणगाव पोलीस ठाणे येथे उपनिरीक्षक सचिन निमकर यांना भेटून पर्यावरणाची गरज पाहता रोपे भेट स्वरूपात देण्यात आली. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णालयातील डीन डॉ. अरुणा पोहरे व डॉ. अर्चना सिंग यांना रोपे दिली. विद्युत महावितरण केंद्र मोर्बा येथे राहुल नवगणे, ग्रुप ग्रामपंचायत येथे सरपंच शौकत रोहेकर, मोर्बा पोस्ट ऑफिस सूचित हारे तसेच युनियन बँकेचे मॅनेजर अतुल शिंदे अशा विविध ठिकाणी रोपे भेट स्वरूपात वाटप करण्यात आली. या सर्व व्यक्तींनी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमामध्ये युनायटेड इंग्लिश स्कूलच्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. राहील गंगरेकर, सेक्रेटरी आमीन धनसे, खजिनदार समिर गंगरेकर, स्कूल कमिटी चेअरमन नासिर डावरे, सदस्य आमीन डावरे, शाळेचे मुख्याध्यापक डॉ. दाऊद खान, उपमुख्याध्यपक रुबिना बडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेत पर्यावरण दिन साजरा केला.

## हाळ गावात वीजवाहिनी उघडी; अपघाताचा धोका

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील हाळ (तिसरे हाळ) येथील विद्युतपुरवठा करणाऱ्या वाहिनी उघडी असून संबंधित विद्युत खांब घराजवळ असल्याने अपघाताची शक्यता आहे.



गेले अनेक दिवस तिसरे हाळ येथे भर वस्तीतल्या विजेच्या खांबावर वीजवाहक केबल उघडी आहे. याबाबत वारंवार भ्रमणध्वनीवरून सूचना केली असता दखल घेतली जात नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला असून लेखी तक्रार देण्याचे विद्युत कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

या वाहिनीतून नेहमी नेहमीच स्पार्किंग होत आहे. आता पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे विद्युत पुरवठा करणाऱ्या लोखंडी खांबातून वीज प्रवाह वाहण्याची शक्यता आहे. परिणामी अपघात झाल्यास जीवित हानीसुद्धा होऊ शकते. वीज पुरवठा यंत्रणा झोपेत आहे की कुणाचा जीव जाण्याची वाट पाहत आहे, असा सवाल हनिफ कर्जिकर यांनी विचारला आहे.

# नागोठणे लायन्स क्लबतर्फे मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान या ठिकाणी श्रीकृष्ण पॅथॉलॉजी लॅबचे संचालक, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान सेक्रेटरी डॉ. अनिल गीते यांच्या मातोश्री स्व. बसंती तुकाराम गीते यांच्या स्मरणार्थ आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांचे सहकार्याने मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन माजी सैनिक निवृत्त प्राथमिक शिक्षक तुकाराम गीते यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी दिवंगत पत्नी बसंती गीते यांची प्रत्येक प्रसंगात खंबीर साथ लाभल्यानेच जीवनात सारे शक्य झाल्याचे सांगितले. डॉ. अनिल गीते, स्मिता पाबरेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

शिबिरास तुकाराम गीते, श्वेता शेलार, डॉ. संगीता गीते, लायन्स क्लबचे अध्यक्ष सुनील कुथे, झोन चेअरमन विवेक सुभेकर, डिस्ट्रीक्ट चेअरमन यशवंत चित्रे, उपाध्यक्ष संतोष शहासने, सेक्रेटरी डॉ. अनिल गीते, खजिनदार दीपक गायकवाड, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रकाश जैन, सुधाकर जवके, दौलतराम मोदी, सुजाता जवके, विलास चौलकर, विशाल शिंदे, विवेक करडे, दीपक लोणारी, दीपिका गायकवाड, ऋतुजा पांचाळ, सखाराम ताडकर, सिध्देश काळे, विद्या म्हात्रे, विजय शहासने यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटलच्या डॉ. सलोनी सुभेकर, विजय बामणे व सोबत त्यांची टीम तसेच नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सुभेकर यांनी व्यक्त केले.

या शिबिरामध्ये ४४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १४ मोतिबिंदू रुग्ण आढळले असून त्यांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे पाठविण्यात आले आहे.



# 'पोस्को स्टील'कडून ग्लोबल वॉलंटिअर वीक उत्साहात



**माणगावः प्रतिनिधी, बातमीदार**

पोस्को स्टील कंपनीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्लोबल व्हॉलंटिअर वीक साजरा केला. या विशेष सप्ताहामध्ये 'पोस्को'च्या जगभरातील युनिट्समधील कर्मचारी सामाजिक योगदान देण्यासाठी पुढे आले. या उपक्रमाचा उद्देश केवळ वस्तूदान किंवा मदत करणे नसून कंपन्यांनी आपली सामाजिक बांधिलकी ओळखून गरजूंच्या जीवनात सकारात्मक बदल घडवावा हा आहे. पोस्को महाराष्ट्र स्टीलनेही मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत विविध सामाजिक उपक्रम राबवले.

या सप्ताहात पोस्को महाराष्ट्र स्टीलने एकूण सात सामाजिक उपक्रम राबवले. वृक्षारोपण उपक्रमांतर्गत २५ शेतकऱ्यांना १९ प्रकारच्या एकूण २५० औषधी, मसाले आणि उपयोगी रोपांचे वाटप करण्यात आले. या रोपांमुळे शेतकऱ्यांना घरच्या घरी उपयोगी झाडे लावण्याची संधी मिळाली. माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमातील विध्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणि एका महिन्याचे अन्नधान्य किराणा देण्यात आले व परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. बोरवाडी येथील माऊली वृद्धाश्रमात पोस्कोचे वरिष्ठ अधिकारी आणि स्वयंसेवकांनी ३० ज्येष्ठ नागरिकांना एका महिन्याचे किराणा साहित्य स्वरुपात मदत केली आणि त्यांच्यासोबत वेळ घालवून मानसिक आधार दिला.

पुण्यातील ज्ञानदा गुरुकुल संस्थेत विद्यार्थ्यांसोबत संवाद, एआय विषयावर माहिती सत्र आणि स्टेशनरी, अन्नधान्य वाटप आयोजित करण्यात आले. सुराज्य प्रकल्पात मुलांसोबत गाणी, गोष्टी आणि बिस्किट वाटपासह शैक्षणिक व क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

ग्रीन सनराईज हिल्स परिसरात ३५ स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता केली, झाडांची निगा राखली आणि भविष्यात १०० झाडे लावण्याचा संकल्पही केला. सेवादीप संस्थेसोबत कपडे, स्टेशनरी, खेळणी आणि इतर साहित्य जमा करून गरजुपर्यंत पोहचवण्याचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांमध्ये १००हून अधिक पोस्को कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकारी सक्रियपणे सहभागी झाले.

## चौल नाका खड्डेमुक्त व्हावा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल नाका रस्ता पावसात चिखलमय आणि खड्डेमय झाला आहे. अलिबाग व मुरूड तालुक्याला मध्यवर्ती असलेले हे ठिकाण असून येथून नित्याने वाहतूक सुरू असते.

गेली अनेक वर्ष चौल नाका पावसाळ्यात खड्ड्यामध्ये असतो. येथून प्रवास करताना प्रवासीवर्गासह वाहनचालकांचे बेहाल होतात. पावसाचे पाणी भरलेल्या खड्ड्यातून मार्गक्रमण करताना वाहनांची तारांबळ उडते. चौलमधील मुख्यः केंद्रबिंदू असलेल्या नाक्यावर ऐन पावसाळ्यात होत असलेली दुरवस्था गेले अनेक वर्षे दिसून येते. यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# वाडगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**



वाडगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वाडगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस अलिबाग तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

जागतिक पर्यावरण दिन ५ जूनच्या औचित्याने वन विभाग, वाडगाव ग्रामपंचायत, वाडगाव ग्रामस्थ तसेच वाडगाव राजिप शाळा विद्यार्थीवर्ग यांच्या सयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला होता. या कार्यक्रमास अलिबाग वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील, वाडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सारिका पवार, उपसरपंच जयेंद्र भगत, ग्रामपंचायत सदस्य नरेश थळे, रामराज वनपाल जयवंत घरत, कार्ला वनपाल तुकाराम जाधव, वनरक्षक कोळेकर, राम टाकरस, ग्रामस्थ कावेरी दराडे, आकांक्षा खांडवे तसेच राजिप शाळा विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

या वेळी वाडगाव येथील राखीव वन क्र.न. १६८ या परिसरात विविध प्रकारची असंख्य वृक्ष रोपट्यांची लागवड करण्यात आली.

वातावरणा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवडीची नित्यांत गरज आहे. वाडगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रतिवर्षी वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येतो, असे वाडगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग तालुकाध्यक्ष जयेंद्र भगत यांनी म्हटले.

# भारतात आता बास्केटबॉल लीग रंगणार



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात आता खेळाडूंना आणखी एक प्लॅटफॉर्म मिळणार आहे. एसीजी स्पोर्ट्स प्रा.लि. आणि बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाने मिळून व्यावसायिक बास्केटबॉल लीग सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. या लीग स्पर्धा पुरुष आणि महिलांसाठीदेखील असणार आहे.

या लीग स्पर्धेला जागतिक स्तरावर घेऊन जाण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी, ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीय बास्केटबॉल लीग (एनबीएल) चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आयुक्त (कमिशनर) जेरेमी लोएलिगर यांची एसीजी स्पोर्ट्सचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नवीन भूमिकेत लोएलिगर लीगच्या ब्लूप्रिंटच्या विकासाचे नेतृत्व करतील.

बास्केटबॉल केवळ एक खेळ नसून नेतृत्व आणि संधी निर्माण करण्याचे एक साधन आहे, असे एसीजीचे व्यवस्थापकीय संचालक करण सिंग म्हणाले तसेच ते पुढे म्हणाले, तळागाळातील उपक्रमांपासून सुरू होणारा आमचा दशकभराचा प्रवास, तरुण खेळाडूंना पुढील भविष्यासाठी संधी निर्माण करून देणार आहे.

याआधी भारतात बास्केटबॉल लीग स्पर्धा खेळवली गेलेली नाही. हा जगातील दुसरा सर्वात प्रसिद्ध खेळ आहे, पण भारतात या खेळाला हवे तितके प्रोत्साहन मिळत नाही. या लीग स्पर्धेमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मिळणार आहे.

**एसीजी स्पोर्ट्सची व्यापक भूमिका**

या उपक्रमात एसीजी स्पोर्ट्स प्रा. लि.ची नेतृत्वाची भूमिका लीग ऑपरेशन्सच्या पलीकडे जाते. त्यांच्या दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून एसीजी वर्षभरात भारतातील पहिले पूर्णपणे निवासी उच्च-कार्यक्षमता केंद्र सुरू करेल. अकादमीमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा असतील. अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील सर्वोत्तम प्रतिभावंत प्रशिक्षकांना निमंत्रित केले जाईल तसेच खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांसाठी व्यापक स्वरूपात प्रशिक्षण दिले जाईल.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शुभम भोईरला ‘रौप्य’

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राजधानी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत खारघरमधील शुभम भोईर याने ७४ किलो वजन गटात रौप्यपदक प्राप्त केले.



इंडियन पॉवर लिफ्टिंग फेडरेशनच्या वतीने दिल्लीतील माँ आद्य शक्ती मंदिर रोहिणी येथे नॅशनल पॉवरलिफ्टिंग जुनिअर, सब ज्युनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, ओडिशा अशा विविध राज्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये खारघरमधील २३ वर्षीय शुभम आदेश भोईर या तरुणाने ७४ किलो वजन गटात रौप्यपदकावर नाव कोरले.

या यशाबद्दल महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग फेडरेशन तसेच राज्यातील विविध संघटना आणि मित्र परिवाराने शुभमचे अभिनंदन केले.

## दृष्टिहीन खेळाडूंसाठी पॉवरलिफ्टिंग प्रशिक्षण आणि निवड शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**

पॅरा ब्लाइंड स्पोर्टस् असोसिएशन व महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील दृष्टिहीन खेळाडूंकरिता एक दिवसीय प्रशिक्षण व निवड शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

शिबिर नॅशनल कॉलेज, बांद्रा वेस्ट, मुंबई येथे ८ जून रोजी वय वर्षे १८ व त्यापेक्षा अधिक खुल्या गटाकरिता देण्यात येणार आहेत. वेळ सकाळी १० ते दुपारी ४ अशी आहे.

या शिबिरात महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक संजय सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक पद्धतीने प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे शिबिर दृष्टिहीन खेळाडूंना पॉवरलिफ्टिंगच्या तंत्राबाबत योग्य प्रशिक्षण देण्याची तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याची संधी आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी नेहा पावसकर अध्यक्ष, पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन (९८२१५८४४३६), पंकज चौधरी, सचिव (९८६९३२९१४१) यांच्याशी संपर्क साधावा.

या शिबिरात निवड झालेल्या खेळाडूंना उडपी (कर्नाटक) येथे २० ते २२ जूनदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. देशभरातील १६पेक्षा अधिक राज्यांचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

## १८ वर्षांखालील निवड चाचणी कबड्डी स्पर्धा पुण्यात

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने १८ वर्षांखालील मुले आणि मुली यांची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा १४ ते १८ जूनदरम्यान पुण्यात आयोजित करण्यात आली आहे.

शिवशक्ती महिला मंडळाच्या यजमानपदाखाली श्री छत्रपती शिवाजी महाराज संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे निवड चाचणी स्पर्धा होईल. यामध्ये महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे एकूण ३१ संघ व व्यवस्थापक सहभागी होणार असून ९००हून अधिक खेळाडूंसाठी निवास व भोजनाची सोय करण्यात आली आहे. बालेवाडी येथील बंदिस्त क्रीडा संकुलातील चार मैदाने आणि इतर क्रीडांगणांवर ही स्पर्धा होणार आहे.

या निवड स्पर्धेतून निवडण्यात आलेला संघ हरिद्वार (उत्तर प्रदेश) येथे २८ जून ते १ जुलैदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com